CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १६ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : १८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

**नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा!**

**आजचा रंग - पांढरा**

**पांढरा रंग मन आणि चित्त यावर चांगला प्रभाव पाडतो. तसेच विचार आणि कार्यामध्ये देखील शुद्धता आणतो..**

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अंगावर शाईफेक



सोलापूर : जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रथमच रविवारी सोलापूर दौऱ्यावर आले सायंकाळी साडेआठच्या दरम्यान त्यांचे शासकीय विश्रामगृहावर आगमन झाले यावेळी प्रशासनाच्या वतीने त्यांचा सत्कार होत असतानाच एका बाजूने भीम आर्मीचा कार्यकर्ता अजय मैंदर्गीकर हा आला, त्याने भारतीय जनता पार्टीचा निषेध असो अशी जोरदार घोषणाबाजी शाई फेकली. खाजगीकरण रद्द करा अशी मागणी करताना बंदोबस्ताला असलेल्या पोलिसांनी त्याला तात्काळ बाजूला काढले.

# शरद पवार पुन्हा ॲक्शन मोडवर

## सत्ताधाऱ्यांवर केला हल्लाबोल; अजित पवार गटालाही केले टार्गेट

सुराज्य/नुंबई

**अजित पवार यांनी बंडखोरी केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार हे पुन्हा एकदा ॲक्शन मोडवर आले आहेत. गेल्या चार महिन्यांत शरद पवारांनी पुन्हा एकदा कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवला आहे. मुंबईत रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा पार पडला. या मेळाव्याच्या माध्यमातून पवारांना सत्ताधाऱ्यांवर आणि त्यांच्या कार्यपद्धतीवर तोफ डागली. या सरकारकडून अनेक चित्र-विचित्र असे निर्णय घेण्यात येत आहेत, त्यामुळे हे सरकार बदलण्याची गरज असल्याचे शरद पवार यांच्याकडून सांगण्यात आले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार रविवारी पक्षाच्या मुंबई अध्यक्ष निवडीनंतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसमोर बोलत होते. यावेळी त्यांनी भारत पाकिस्तान सामना, कंत्राटी पद्धतीने करण्यात येणारी भरती, महिला आणि मुलींच्या बेपत्ता होण्याचे वाढलेले प्रमाण, महानगरपालिकांच्या शाळांचे खासगीकरण तसेच अनेक महत्त्वांच्या विषयांवरून सरकारवर निशाणा साधला.

### भाजप आहे कुठं?

देशाचा नकाशा तुमच्या डोळ्यासमोर ठेवा, प्रत्येक राज्याची स्थिती लक्षात घ्या, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगाणामध्ये भाजप नाही मग आहे कुठं? गोव्यात नव्हता पण आमदार फोडले आणि राज्य घेतले. महाराष्ट्रात उद्धव ठाकरेंचं सरकार होतं, आमदार फोडले आणि सरकार घेतलं. गुजरातमध्ये त्यांचं राज्य आहे हे मान्य करतो. कमलनाथ यांचे मध्य प्रदेशातील सरकार पाडलं. भाजप राजस्थानमध्ये नाही, पंजाबमध्ये नाही, झारखंडमध्ये, पश्चिम बंगाल नाही, असं शरद पवार यांनी सांगितले.

पवार पुढे म्हणाले की, आपल्यावर दोन ठिकाणी खटले दाखल आहेत. एक खटला निवडणूक आयोगात आहे. तेथे सांगण्यात येतेय की, हा पक्ष त्यांचाच आहे. दुसरा खटला सर्वोच्च न्यायालयात दाखल आहे. या दोन्ही ठिकाणी तुमच्या खऱ्या राष्ट्रवादीला संघर्ष करण्याचा प्रसंग आपल्या जुन्या सहकाऱ्यांनी आणला. मला खात्री आहे की, आज ना उद्या निकाल लागेल त्यावेळी सामान्य माणसाच्या अंतःकरणात बसलेली खरी राष्ट्रवादी कोण याचा निकाल आपल्या बाजूने होईल आणि चित्र बदलेल, असा आशावाद राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला.

आपल्या खटल्यात निष्णात वकील काम करत आहेत आपल्या पक्षाच्या वतीने ही कोर्ट कचेरी चालू आहे. जितेंद्र आव्हाड आणि सुप्रिया सुळे या सर्व कोर्टाच्या कामात माहिती घेण्यासाठी उपस्थित असतात. मी वकिलांना लागणारी मदत देत असतो. यामुळे दिवसेंदिवस आपले म्हणणे सत्यावर आधारित आहे हे लोकांसमोर येईल, याची मला खात्री आहे. आज संपूर्ण देशात कुणी काही म्हटले तरी भाजपच्या बरोबर जे जाऊ इच्छितात लोक त्यांच्याबरोबर नाहीत. देशपातळीवरील चित्र बदलेल, असं शरद पवार म्हणाले.

### चित्र-विचित्र निर्णय घेणारे सरकार बदलण्याचे आवाहन

### समीर भुजबळ यांच्या निवडीवरुन अजित पवार गटाला टोला

मी दोन तीन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात वाचले की कधी काळी आपल्याबरोबर काम करणाऱ्या लोकांनी वेगळा रस्ता स्वीकारला आणि त्यांनी सुद्धा त्यांच्या अध्यक्षांची निवड केली. फरक एवढाच आहे की तुम्ही ज्यांची निवड केली ते कधी तुरुंगात गेले नव्हते. दुसऱ्या बाजूचे कुठे गेले हे तुम्हाला माहिती आहे, असं शरद पवार म्हणाले.



### महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

शरद पवारांनी राज्यातील कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करत म्हटले की, विधीमंडळात पावसाळी अधिवेशनाच्यावेळी विचारलेल्या प्रश्नात माजी मंत्र्यांनी १९ हजार ५५३ मुली आणि महिला बेपत्ता झाल्याची माहिती दिली. एवढ्या महिला आणि मुली गायब आहेत, त्यांच्या घरच्यांची काय अवस्था असेल. ज्या महिला आणि मुली बेपत्ता आहे, त्यांची काय अवस्था असेल. त्यामुळे राज्यातील महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न देखील आता ऐरणीवर आला आहे. त्यामुळे हे सरकार बदलण्याची भूमिका आता आपल्याला घेणे गरजेचे आहे.

### विश्वचषकात मोठा उलटफेर

## अफगाणचा जग्गजेत्या इंग्लंडवर विजय

दिल्ली

सध्या सुरु असलेल्या विश्वचषकामध्ये रविवारी मोठा उलटफेर झाला. अफगाणिस्तानाने जग्गजेत्या इंग्लंड संघावर दणदणीत ६९ धावांनी विजय मिळविला. विजयासाठी आवश्यक २८५ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संपूर्ण संघ २१५ धावांवर संपुष्टात आला. हा इंग्लंडचा तीन सामन्यातील दुसरा पराभव ठरला.

सुरुवातीला इंग्लंडने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजीकरत सर्वबाद २८४ धावा केल्या. त्यांच्याकडून सलामीवीर रहमानुल्लाह गुरबाजने वादळी फलंदाजी केली. त्याने फक्त ५७ चेंडू ४ षटकार आणि ८ चौकारांसह ८० धावा केल्या. कर्णधार अक्रम अकील याने ५८ धावांचे योगदान दिले. विजयाचा पाठलाग करताना इंग्लंडकडून हॅरीब्रुक याने ६६ तर डेव्हिड मलान ने ३२ धावा केल्या. बाकी इंग्लंडचे सर्व दिग्गज फलंदाज अफगाणच्या माऱ्यापुढे टिकू शकले नाही. अफगाणकडून मुजिब रहिमान आणि राशिद खान यांनी तीन विकेटस् घेतल्या.

यापूर्वीही इंग्लंडला १९९२ मध्ये झिम्बावे कडून २०११ मध्ये आर्यलंड आणि बांग्लादेश यांच्याकडून तर २०१५ मध्ये पुन्हा बांग्लादेशकडून पराभव पत्करावा लागला आहे.

## भवानी ज्योत आणताना विविध ठिकाणी अपघात; ८ तरुण जखमी

सुराज्य/सोलापूर

तुळजापूर येथे भवानी ज्योत आणण्यासाठी व तसेच तेथून परत येत असताना विविध ठिकाणी झालेल्या अपघातामध्ये दुचाकी वरील ८ तरुण जखमी झाले. सर्व जखमींना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले .

सुरज भीमराव पवार (वय १९ ) आणि त्याचा भाऊ राजकुमार पवार (वय १४ दोघे रा.अंजनगाव (ता.माढा) अशी पहिल्या अपघातातील जखमींची नावे आहेत. ते दोघे शनिवारी रात्री वाजेच्या सुमारास अंजनगाव येथून तुळजापूर येथे जोत आणण्यासाठी दुचाकीवरून जात होते. तुळजापूरच्या अलीकडे रस्त्यावरील खांबाला धडकल्याने दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुसऱ्या ठिकाणच्या अपघातामध्ये सोहेल समीर मुल्ला (वय १८ रा.कोळीगल्ली मंगळवेढा) हा जखमी झाला. तो सोलापूरहून तुळजापूरकडे दुचाकी वरून निघाला होता. रविवारी पहाटे दोनच्या सुमारास तामलवाडी आपल्या टोलनाकाजवळ दुचाकी घसरल्याने तो जखमी झाला. त्याला सार्थक (मित्र) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. तिसऱ्या ठिकाणच्या अपघातामध्ये महेश शिवाजी ईश्वरकट्टी (वय ३२ रा. शांतीनगर मजरेवाडी) आणि दीपक गणेश तळे (वय २२ रा.कुंभार गल्ली, सोलापूर) हे दोघे तुळजापूरहून सोलापूरकडे दुचाकीवरून येत होते. रविवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास माळुंब्रा गावाजवळ दुचाकी स्लिप झाल्याने दोघेही जखमी झाले. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिन्ही अपघाताची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### गेंट्याल चौकाजवळ दुचाकी स्लीपं

चौथ्या घटनेत सोलापुरातील गेंट्याल चौकाजवळ झालेल्या अपघातामध्ये दुचाकी वरील तिघेजण जखमी झाले. हा अपघात रविवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास घडला. महेश उपेंद्र नुती (वय २४ रा.गुरुदेव नगर एमआयडीसी), बालाजी घायल (वय२५) आणि संतोष अभयकुमार सोनकांबळे (वय २६ दोघे रा.मल्लिकार्जुन नगर) हे तिघेजण ट्रिपलसीट तुळजापूरहून सोलापूरकडे निघाले होते. शहरातील गेंट्याल चौकाजवळ रविवारी पहाटे २ वाजता दुचाकी समोर कुत्रा आडवा आल्याने घसरून तिघेजण जखमी झाले. त्यांना देखील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघाताची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## पिकपच्या धडकेने दुचाकी चालक ठार

सुराज्य/सोलापूर

घराकडे जात असताना पाठीमागून पिकअप धडकल्याने दुचाकी वरील धनाजी उत्तम रीतुंड (वय ४५ रा. वाडीकुरोली ता.पंढरपूर) हे गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले. हा अपघात भंडीशेगाव (ता.पंढरपूर) येथील रॉयल हॉटेल समोर शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडला. या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी अपघातानंतर न थांबता पसार झालेल्या पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. धनाजी रितूंड हे आपल्या दुचाकीवरून पंढरपूर ते भंडिशेगाव मार्गे आपल्या घराकडे निघाले होते. सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास पाठीमागून एमएच४५- टी-३३२१ या क्रमांकाचा पिकअप धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले. अशी नोंद पंढरपूर ग्रामीण पोलिसात झाली. पुढील तपास सहाय्यक फौजदार कर्चे करीत आहेत.



रविवारी शारदीय नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला. रुपाभवानी मंदिरात पहाटेच्या सुमारास घटस्थापना करण्यात आली. यावेळी देवीला विविध आभुषणांनी सजविण्यात आले होते.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; दोन वेळा गर्भपात

सुराज्य/सोलापूर

विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देऊन सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून विवाहितेला वेगवेगळ्या कारणावरून त्रास दोन वेळा गर्भपात केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १ एप्रिल २०२० ते २४ जुलै २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. याप्रकरणी अर्चना सुशांत आडकी (वय-३०,रा.गणेश पेठ,सोलापूर,सध्या-दत्तवाडी आकुर्डी, पुणे) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती सुशांत आडकी,सासरे श्रीनिवास आडकी,सासू राधाबाई आडकी,नणंद सुनीता गवनी,नणंदेचे पती हरिनाथ गवनी (सर्व.रा.गणेश पेठ, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई राठोड हे करीत आहेत.

## पांगरी येथे किरकोळ कारणावरून चाकूने हल्ला

सुराज्य/सोलापूर

भावाला शिवीगाळ केल्याच्या जाब विचारल्याच्या कारणावरून १८ वर्षीय तरुणाला चाकूने मारून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना पांगरी(ता. लुका बार्शी) येथे प्रतीक नावाच्या दुकानासमोर शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली.




प्रतीक लक्ष्मण गायकवाड (वय १८ रा. पांगरी) असे जखमीचे नाव आहे.त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पांगरीच्या पोलिसांनी सागर रमेश जानराव (रा.पांगरी) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. सागर जानराव याने प्रतीक याचा भाऊ प्रवीण याला शिवीगाळ केली होती. या संदर्भात प्रतीक गायकवाड याने दुकानाजवळ आलेल्या आरोपीला जाब विचारला होता. तेव्हा आरोपी जानराव याने त्याला धक्काबुक्की करीत चाकूने मानेवर मारून गंभीर जखमी केले . तसेच घरातील लोकांना ठार मारण्याची धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार कोठावळे पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अलीकडे असे 'लाईट कलर'चे कपडे मी घालत नाही !


# इंद्रभुवनची स्थलांतर प्रकिया अंतर्गत सुशोभिकरणामुळे रखडली

सुराज्य/सोलापूर

**११० वर्षे जुन्या असणाऱ्या महापालिकेच्या ' इंद्रभुवन ' हेरिटेज वास्तूचा मे महिन्यात धुमधडाक्यात लोकार्पण सोहळा झाला. ऑगस्ट अखेरपर्यंत आयुक्त कार्यालयाचे होणारे स्थलांतर अंतर्गत सुशोभीकरणाच्या कामामुळे रखडले आहे. अद्यापही हे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे आता ही स्थलांतर प्रकिया दिवाळीनंतरच होण्याची शक्यता आहे.**

स्मार्ट सिटी योजनेत समावेश झाल्यानंतर पुरातन वारसा इमारतींचे पुनरुज्जीवन प्रकल्पाद्वारे ५.१३ कोटी रुपये निधी खर्चून इंद्रभुवन इमारतीचे नूतनीकरण करण्यात येत आहे. या हेरिटेज इमारतीचे बाहेरील बाजूचे नूतनीकरणाचे व सुशोभीकरणाचे काम सनरक्षण हेरिटेज कन्सल्टंट कंपनीमार्फत कंजर्व्हेशन आर्किटेक्चर मुनीष पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली ११ महिन्यात करण्यात आले. या हेरिटेज इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाई कायमस्वरूपी करण्यात आली आहे.

### ऑगस्ट अखेर होणारे स्थलांतर अद्यापही नाही



यापूर्वी या इमारतीत सोलापूर महापालिकेच्या आयुक्तांचे कार्यालय होते. बाह्य नूतनीकरणाच्या कामानंतर अंतर्गत फर्निचरचे काम हाती घेण्यात आले होते. इमारतीतील विविध कार्यालयात आवश्यक असणाऱ्या फर्निचरचे काम ऑगस्ट अखेर पूर्ण होऊन इमारतीतील पूर्वी असणारी वरिष्ठ महापालिका अधिकाऱ्यांची कार्यालये आतापर्यंत स्थलांतरित होणे आवश्यक होते. ऑगस्टच्या अखेरीस या इमारतीतील सर्व प्रशासकीय कार्यालय सुरू होतील असे आयुक्तांनी सांगितले होते.

दुसऱ्या मजल्यावर असणाऱ्या आयुक्त कार्यालयात जाण्यासाठी इमारतीच्या पाठीमागील बाजूस बाहेरील बाजूने लिफ्ट बसवण्याचे सुरू असलेले काम अद्याप पूर्ण झालेले नाही. अंतर्गत सुशोभीकरणाच्या व फर्निचर काम संथ गतीने सुरू असल्याने हेरिटेज इमारतीतून सुरू होणारा वरिष्ठ महापालिका अधिकाऱ्यांचा प्रशासकीय कारभार आता दिवाळीनंतरच सुरू होण्याची शक्यता आहे.

### मुंबईनंतर सोलापुरात हेरिटेज वास्तूमध्ये असणार आयुक्तांचे कार्यालय

या इंद्रभवन इमारतीत महापालिका आयुक्त, २ अतिरिक्त आयुक्त, दोन उपायुक्त, चार सहाय्यक आयुक्त यांची कार्यालय राहणार आहेत. खाली कलादालन आहे. यामध्ये ऐतिहासिक वस्तू संग्रहालय राहणार आहे. मुंबईनंतर सोलापुरात हेरिटेज वास्तूमध्ये महापालिका आयुक्तांचे कार्यालय आहे.

CMYK

# बाळ की आई?

गर्भपात करण्याचा महिलेचा अधिकार हा विषय नेहमीच चर्चेत असतो. अनेकदा महिलेची इच्छा असूनही डॉक्टर गर्भपातास नकार देतात. अशा प्रकरणांत महिलांना थेट न्यायालयात धाव घ्यावी लागते. भारतातील गर्भधारणा आणि गर्भपातविषयक कायद्यामुळे हा पेच निर्माण होतो. नुकतेच पोटात २६ आठवड्यांचे बाळ असलेल्या एका महिलेने थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेत गर्भपातास परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. सध्या या याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू असून, हे प्रकरण न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठाकडे सोपवण्यात आले आहे. या प्रकरणामुळे महिलेचा गर्भपाताचा निर्णय आणि या अधिकाराचे कायदेशीर स्थान यांची पुन्हा एकदा चर्चा होऊ लागली आहे. दोन मुले असलेल्या एका २७ वर्षीय महिलेने गर्भपात करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी न्यायालयाकडे केली आहे. माझी गर्भधारणा अनैच्छिक आहे. मला अगोदरच दोन मुले आहेत. माझ्या कुटुंबाचे उत्पन्न हे आणखी एका अपत्याला सांभाळण्यास पुरेसे नाही. प्रसूतीनंतर मी नैराश्यात गेले होते. या नैराश्यामुळे माझ्यावर सध्या औषधोपचार सुरू आहेत. त्यामुळे मला तिसरे मूल नको आहे. म्हणून मला गर्भपात करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी या महिलेने केली आहे. याच प्रकरणावर ९ ऑक्टोबर रोजी न्यायमूर्ती हिमा कोहली आणि बी. व्ही. नागरत्ना यांच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने



सुनावणी घेतली. यावेळी त्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून याचिकाकर्त्या महिलेशी संवाद साधला; तसेच महिलेला गर्भपात करण्यास परवानगी दिली. गर्भधारणा होऊ नये म्हणून वापरण्यात आलेली पद्धत अयशस्वी झाल्यामुळे महिला गरोदर राहिली. अशा प्रकारे महिला गर्भवती राहिल्यास ही एक प्रकारे सक्तीची, लादलेली गर्भधारणाच आहे. अशा प्रकरणात गर्भधारणा झाल्यानंतर २४ आठवड्यांपर्यंत गर्भपात करण्यास परवानगी आहे, असे निरीक्षण न्यायालयाने यावेळी मांडले. मात्र, न्यायालयाने गर्भपाताची परवानगी दिलेली असली तरी डॉक्टरांपुढे कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. महिलेला गर्भपातासाठी आवश्यक ती सर्व मदत करावी, असे आदेश न्यायालयाने दिल्लीतील एम्स रुग्णालयाला दिले होते. मात्र, कायद्यानुसार बाळ नॉर्मल नसणे, त्याला गंभीर अपंगत्व येण्याची शक्यता असणे, आईच्या जीवाला गंभीर धोका असणे यांसारख्या अपवादात्मक परिस्थितीत २४ आठवड्यांच्या आत गर्भपाताची परवानगी दिली जाते. या महिलेच्या बाबतीत ही मुदत संपली आहे. तिच्या पोटात २६ आठवड्यांचे बाळ आहे. याच कारणामुळे एम्स रुग्णालयाने या कायदेशीर पेचाबाबत काय करायचे? बाळ निरोगी आहे, आईही त्याला जन्माला घालण्यास सक्षम आहे. अशा परिस्थितीत गर्भपाताला परवानगी देणे म्हणजे गर्भाशयात जिवंत असलेल्या जीवाचा जन्माला येण्याचा अधिकार नाकारण्यासारखे आहे. याबाबत काय करावे, असा प्रश्न रुग्णालयाने पत्राच्या माध्यमातून केला आहे. रुग्णालयाने उपस्थित केलेल्या प्रश्नानंतर महिलेला गर्भपातास परवानगी देणाऱ्या द्विसदस्यीय खंडपीठातील दोन्ही न्यायाधीशांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. न्यायमूर्ती हिमा कोहली यांनी गर्भपाताला परवानगी देता येणार नाही, अशी भूमिका घेतली आहे; तर न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी गर्भपात करण्यास परवानगी दिली आहे. याच कारणामुळे हे प्रकरण ११ ऑक्टोबर रोजी त्रिसदस्यीय खंडपीठाकडे वर्ग करण्यात आले आहे. या खंडपीठाच्या अध्यक्षस्थानी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आहेत. या प्रकरणात त्रिसदस्यीय खंडपीठाने महिला आणि बाळाच्या प्रकृतीबाबत नव्याने वैद्यकीय अहवाल मागवला आहे. गर्भपाताच्या (मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नसी-एमटीपी) कायद्यानुसार महिलेला गर्भपात करण्यास परवानगी दिली जाते. बाळाच्या जगण्याचा अधिकार महत्त्वाचा की महिलेचा अधिकार अधिक महत्त्वाचा? यावर हे खंडपीठ निर्णय घेणार आहे.

## सामाजिक

# इस्रायल-हमास युद्धाचा धडा

**इस्रायलवर ७ ऑक्टोबरला हमासने अचानक हल्ला चढवला. अवघ्या वीस मिनिटांत पाच हजार रॉकेट्सचा मारा हमासने इस्रायलवर केला. इस्रायलभोवती असलेले सुरक्षा कवच भेदून आणि तारेचे कुंपण उद्ध्वस्त करून हमासचे दहशतवादी घुसले. अचानक झालेला गोळीबार आणि रॉकेटचा मारा यातून इस्रायलमध्ये हाहाकार उडाला. हमासने केलेल्या हल्ल्यात इस्रायलचे दीड हजार नागरिक तरी मृत्युमुखी पडले. हमासच्या दहशतवाद्यांनी इस्रायलच्या तीन-चारशे स्त्री-पुरुष, मुलांचे बंदुकीच्या धाकावर अपहरण केले. महिलांना निर्वस्त्र करून त्यांच्यावर अत्याचार केले. हमासने संपूर्ण जगाला क्रूरतेचे भीषण दर्शन घडवले.**

इस्रायलची गुप्तचर यंत्रणाही जगात आधुनिक अत्यंत सक्षम म्हणून ओळखली जाते. मग हमास या दहशतवादी संघटनेने एवढा मोठा हल्ला केला, हजारो क्षेपणास्त्रे आणि रॉकेट्सचा मारा केला. देशात घुसून गर्दीच्या ठिकाणी बेछूट गोळीबार केला, बायका-मुलांचे अपहरण केले, त्यांच्यावर अत्याचार केला, देशाच्या सरहद्दीवरील सुरक्षा कुंपण व तारांच्या जाळीच्या मजबूत भिंती बुलडोझरने पाडून घुसखोरी केली, याची थोडी सुद्धा कल्पना इस्रायलला कशी आली नाही?

विज्ञान-तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. युद्ध हे मैदानावर लढण्याची वेळ कधीच निघून गेली आहे. अल् कायदाच्या दहशतवाद्यांनी ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या चार विमानांचे अपहरण केले होते. या चारही विमानांनी वेगवेगळ्या ठिकाणी धडक देऊन हाहाकार उडवायचा, हा दहशतवाद्यांचा हेतू होता. न्यूयॉर्क शहरातील वर्ल्ड ट्रेड सेंटरला एक विमान धडकले. याच शहरात दक्षिणेला असलेल्या टॉवरला दुसऱ्या विमानाने धडक दिली. वॉशिंग्टनमधील संरक्षण मंत्रालयाच्या पेंटागॉनला एका विमानाने धडक मारली. दहशतवाद्यांचे लक्ष्य व्हाईट हाउस हे होते. पण तेथील गर्दी पाहून वैमानिकाचे नियंत्रण सुटले व पेनिसिल्वेनियाच्या शेक्सवीलमध्ये ते कोसळले. अमेरिकेच्या संवेदनशील भागावर धडक देण्यासाठी दहशतवादी प्रवासी विमानांचा उपयोग करतील, असा कधी विचारही अमेरिकेने केला नव्हता. अमेरिकेत झालेले चार विमानांचे अपहरण, भारतात झालेले आयसी १८४ या विमानाचे झालेले अपहरण, पाकिस्तानच्या आयएसआय प्रशिक्षित १० दहशतवाद्यांनी मुंबईवर केलेला हल्ला, संसदेत घुसून दहशतवाद्यांनी केलेला हल्ला, मुंबईत घडवलेले १२ बॉम्बस्फोट, पुलवामा येथे सुरक्षा दलाच्या वाहनांवर झालेला दहशतवादी हल्ला अशा कितीतरी घटना सांगता येतील की, 'गुप्तचर यंत्रणेला गुंगारा देऊन दहशतवाद्यांनी रक्तरंजित सडे रस्त्यावर शिंपडले आहेत. खलिस्तानी नेता गुरपतवंत सिंग पन्नू हमासप्रमाणे भारतावर हल्ला करण्याची धमकी देत आहे.'

भारतावर गेल्या चार दशकांत अनेक भयावह दहशतवादी हल्ले झाले आहेत. आयएसआय, हमास, खलिस्तान, लष्कर-ए-तोयबा, जैश ए मोहम्मद अशा अनेक संघटना हल्ले करण्यास संधी शोधत असतात. जुलै २०१६ मध्ये केंद्राने सन २००५ पासून भारतावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांची आकडेवारी जाहीर केली. या काळात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये ७०७ लोक ठार झाले व ३२०० हून अधिक जखमी झाले. गेल्या चार दशकांतील दहशतवादी घटनांची यादी पाहिली, तर भारताने सदैव सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. हमासने तिकडे हिंसाचार-रक्तपात घडवला म्हणून भारताने बेसावध राहून चालणार नाही.

दि. १७ ऑक्टोबर १९९१ रोजी खलिस्तान नॅशनल आर्मीने उत्तराखंड येथे रूद्रपूर शहरात केलेल्या बॉम्बस्फोटात ४० जण ठार व १४० जखमी झाले. दि. २१ मे १९९१ रोजी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची तामिळनाडूतील श्रीपेरूबंदर येथे आत्मघाती बॉम्बस्फोटामुळे हत्या झाली. त्यांच्याबरोबर अन्य १६ जण ठार, ४३ जण जखमी झाले. दहशतवाद्यांचे लक्ष्य राजीव गांधी हेच होते. आरडीएक्सने भरलेला पट्टा



आत्मघाती बॉम्बस्फोटासाठी वापरण्यात आला. त्याच वर्षी पंजाबमध्ये खलिस्तानी अतिरेक्यांनी १५ जून १९९१ रोजी लुधियाना जिल्ह्यात रेल्वेमध्ये घडविलेल्या बॉम्बस्फोटात १२६ जण ठार झाले. दि. ८ नोव्हेंबर १९९१ रोजी कल्याण रेल्वे स्टेशनवर झालेल्या बॉम्बस्फोटात १२ ठार व ६५ जखमी झाले.दि. १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत दहशतवाद्यांनी १२ ठिकाणी बॉम्बस्फोट घडवले. त्यात २५७ ठार व १४०० लोक जखमी झाले. या हल्ल्याचा मास्टर माइंड दाऊद इब्राहिम असल्याचे तपासात निष्पन्न झाले. दि. २१ मे १९९३ रोजी दिल्लीतील लाजपत नगर मार्केटमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात १३ ठार व ३९ जखमी झाले. जम्मू-काश्मीर इस्लामिक लिबरेशन फ्रंटच्या सहा दहशतवाद्यांना दोषी ठरविण्यात आले. दि. २२ मे १९९६ रोजी राजस्थानातील दौसा येथे सामलेटी गावाजवळ बसमध्ये बॉम्बस्फोट झाला व त्यात १४ प्रवासी ठार झाले व ३७ जखमी झाले. काश्मीर इस्लामिक फ्रंटने हा बॉम्बस्फोट घडवला. ब्रह्मपुत्रा मेलमध्ये ३० डिसेंबर १९९६ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ३३ लोक ठार झाले. बॉम्बस्फोटाने रेल्वे रुळावरून घसरली. दि. १४ फेब्रुवारी १९९८ रोजी कोइम्बतूरमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात ५८ लोक ठार झाले व अन्य ११ ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटात २००हून अधिक जखमी झाले. राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्यावर २२ डिसेंबर २००० रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात दोन सैनिक व एक नागरिक ठार झाला. पाकिस्तानच्या लष्कर-ए-तोयबाने हा हल्ला घडवला. १ ऑक्टोबर २००१ रोजी जम्मू-काश्मीरच्या विधानसभेवर कार बॉम्बस्फोट झाला. तीन आत्मघाती हल्लेखोरांसह हल्ला झाला. त्यात ३८ लोक ठार झाले, ६० जखमी झाले, तीनही हल्लेखोर ठार झाले. भारतीय संसद भवनावर १३ डिसेंबर २००१ रोजी दहशतवादी हल्ला झाला. लष्कर-ए-तोयबा व जैश-ए-मोहम्मद यांनी हल्ला घडवला. आठ सुरक्षारक्षक, एक माळी असे नऊजण ठार झाले, १८ जण जखमी झाले. लष्करी गणवेशात घुसलेले आठही दहशतवादी ठार मारले गेले. दि. २ डिसेंबर २००२ रोजी मुंबईतील घाटकोपर बस स्थानकाजवळ बेस्ट बसमधील सीटखाली ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट होऊन त्यात २ ठार झाले व ५० हून अधिक जखमी झाले. दि. २४ सप्टेंबर २००३ रोजी गुजरात गांधीनगर येथील अक्षरधाम मंदिरावर दहशतवाद्यांनी हल्ला केला. त्यात ३३ ठार व ६० जखमी झाले. दि. २७ जानेवारी २००३ रोजी मुंबईतील विलेपार्ले रेल्वे स्थानकाजवळ सायकलवर ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट झाला. त्यात एकाचा मृत्यू झाला व २८ जखमी झाले. त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे मुंबईला त्या दिवशी भेट देणार होते.

दि. १३ मार्च २००३ रोजी मुंबईतील मुलुंड येथे लोकल ट्रेनमध्ये गर्दीच्या वेळेत रात्री पावणेआठ वाजता बॉम्बचा स्फोट झाला. हा बॉम्ब प्रथम श्रेणीच्या महिलांच्या डब्यात ठेवण्यात आला होता. त्यात १० ठार झाले व ७० जखमी झाले. दि. २५ ऑगस्ट २००३ रोजी मुंबईत दुहेरी कार बॉम्बस्फोटात ५४ लोक मारले गेले व ३०० जखमी झाले. एक बॉम्बस्फोट गेट वे ऑफ इंडियाजवळ झाला, तर दुसरा झवेरी बाजारात ज्वेलरी मार्केटमध्ये झाला. दोन्ही ठिकाणी पार्क केलेल्या टॅक्सीत बॉम्ब ठेवले होते. दि. २९ ऑक्टोबर २००५ रोजी दिल्ली झालेल्या तीन बॉम्बस्फोटात ६२ लोक ठार झाले व २१० जखमी झाले. दि. ११ जुलै २००६ रोजी मुंबईत लोकल ट्रेनमध्ये ऐन गर्दीच्या वेळेत सात वेगवेगळ्या लोकल्समध्ये बॉम्बस्फोट घडविण्यात आले. अवघ्या ११ मिनिटांच्या कालावधीत हे सारे घडले. पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय रेल्वे गाड्यांत प्रेशर कुकरमध्ये बॉम्ब ठेवण्यात आले होते. या स्फोटांत २०९ लोकांचा मृत्यू झाला व ७०० हून अधिक जखमी झाले. दि. १८ फेब्रुवारी २००७ रोजी समझोता एक्स्प्रेसमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या बॉम्बस्फोटात ७० जण ठार झाले. त्यात डझनभर तरी जखमी झाले. बहुतांशी पाकिस्तानी होते. मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले. पाकिस्तानमधील एका दहशतवादी संघटनेने चार दिवस मुंबईला वेठीला धरले होते. त्यात १७५ ठार झाले. ३००हून अधिक जखमी झाले. ९ दहशतवादी हल्लेखोरही मुंबई पोलिसांनी टिपले. दि. १३ जुलै २०११ रोजी मुंबईत सायंकाळी ऑपेरा हाउस, झवेरी बाजार, दादर, पश्चिम अशा गर्दीच्या भागात बॉम्बस्फोट झाले. त्यात २६ ठार व १३० जखमी झाले. या हल्ल्यामागे इंडियन मुजाहिद्दीनचा सहभाग होता.

दि. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर भारतीय सुरक्षा जवानांना घेऊन जाणाऱ्या वाहनांवर पुलवामा जिल्ह्यात लेथापोरा येथे आत्मघाती हल्लेखोरांनी हल्ला केला. त्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ४० जवान शहीद झाले. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील जैश-ए-मोहम्मद संघटनेने स्वीकारली.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# नवरात्रीचे पालटलेले स्वरूप !

**देवीने ९ दिवस महिषासुराशी युद्ध करून दहाव्या दिवशी त्याचा वध केला याचे प्रतीक म्हणून गुजरातमध्ये दांडिया खेळला जातो. दांडिया म्हणजे देवीच्या हातातील शस्त्र असून पूर्वी युद्धाच्या अविर्भावात तो खेळला जात असे. कालांतराने त्याला आता नृत्याचे स्वरूप आले आहे. महाराष्ट्रापासून गुजरात जवळच असल्याने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातही नवरात्री हा उत्सवासारखा साजरा होऊ लागला आहे. त्यानिमित्ताने इथेही रासगरबा आणि दांडिया खेळला जाऊ लागला आहे. हिंदूंच्या धार्मिक उत्सवांचे बाजारीकरण होऊ लागले आहे. त्यापासून नवरात्री उत्सवही मागे राहिलेला नाही. नवरात्री उत्सवाचे मुंबईसारख्या शहरांत इव्हेन्ट होऊ लागले आहेत. धनाढ्य उद्योगपती, राजकारणी मोठी मैदाने आरक्षित करून याठिकाणी नऊ दिवस गरब्याचे कार्यक्रम आयोजित करतात. या इव्हेंटमध्ये मोठमोठे वाद्यवृंद, गायक आणि सिनेसृष्टीतील कलाकारांना बोलावून लोकांना आकर्षित केले जाते. स्पर्धांचे आयोजन करून प्रतिदिन उत्कृष्ट नृत्य आणि वेशभूषा करणाऱ्यांना बक्षिसे दिली जातात. गरब्यात सहभागी होणाऱ्यांसाठी शेकडो रुपयांची प्रवेश फी आकारली जाते. श्रीमंतांची मुले या कार्यक्रमांत हिरीरीने सहभागी होतात.**

**महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र! नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणून पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे.**

नवरात्र हा खरेतर देवीच्या उपासनेचा उत्सव मात्र हल्ली जसे दहीहंडी उत्सवात दहीहंडी नावाला आणि केवळ मानवी मनोऱ्यांचीच स्पर्धा पाहायला मिळते, त्याप्रमाणे नवरात्री उत्सवात देवीची उपासना नगण्य आणि तरुणांची मौजमजाच अधिक पाहायला मिळते आहे.

गेल्या काही वर्षांत नऊ रात्रीच्या नऊ दिवसांत वेगवेगळ्या रंगाचे वेष परिधान करण्याचा ट्रेंड फोफावला आहे. ज्याला धर्मशास्त्राचाच नव्हे तर तर्कशास्त्राचाही आधार नाही. तरीही स्त्रीवर्ग यासाठी आधीच सज्ज होतो. यंदाच्या नऊ दिवसांचे नऊ रंग कोणते हे एकदा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले की त्या रंगांचे कपडे आपल्याकडे सुस्थितीत आहेत का हे पाहिले जाते. नसतील तर ते खरेदी केले जातात. नऊ दिवस वेगवेगळ्या रंगांचे कपडे परिधान करायचे म्हणजे त्या रंगाला अनुसरून कानातले, गळ्यातले, नाकातले दागिनेही मॅचिंग असायला हवेत. केशभूषाही त्यानुरूप असायला हवी, मग त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. स्त्री वर्गासह आता पुरुष वर्गही काही प्रमाणात या रंगसंगतीत सहभागी होऊ लागला आहे. नवरात्रीच्या निमित्ताने गरब्यात नृत्य करायला जायचे म्हणून अनेक तरुण तरुणी नवरात्रीच्या एक महिना आधीपासूनच नृत्याचे वर्ग लावून घेतात. अर्थात नवरात्रीच्या निमित्ताने विशेष नृत्य शिकवणारे नृत्याचे वर्गही या दिवसांत मोठ्या प्रमाणात उदयास येतात. नृत्य करताना परिधान करण्यासाठी विशेष प्रकारचे पोषाखही खरेदी केले जातात. हे पोशाख विकणारेही या दिवसात फॉर्मात असतात. हा सर्व प्रकार पूर्वी केवळ श्रीमंत वर्गात पाहायला मिळत असे; मात्र गेल्या काही वर्षांत यामध्ये मध्यमवर्गीय तरुण तरुणीही सहभागी होऊ लागले आहेत.



देवीच्या उत्सवाचे जसे बाजारीकरण होऊ लागले, तशा काही विकृतींचाही शिरकाव या उत्सवात होऊ लागला आहे. विशेषतः स्त्रीवर्ग या विकृतीला बळी पडू लागला आहे. रात्री गरबा खेळायला जाताना विविध प्रकारचे टॅटू अंगावर काढून घेऊन मिरवण्याचा ट्रेंड फोफावत चालला आहे. बॅकलेस ब्लाउज घालून उघड्या पाठीवर किंवा उघड्या दंडावर विविध टॅटू काढून घेतले जातात. त्यासाठी हजारो रुपये खर्च केले जातात. काही ठिकाणी तर टॅटू काढणाऱ्यांचा धंदा तेजीत चालावा या हेतूने टॅटूच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यांच्या अंगावरील टॅटू अधिक आकर्षक त्यांना बक्षीस दिले जाते. अशा प्रकारे शरीराचा भाग उघडा ठेवून त्यावर टॅटू काढून मिरवण्यात कसली आली आहे भक्ती? हे असले प्रकार देवीला तरी आवडणार आहेत का? नवरात्रीत सार्वजनिक ठिकाणी गरबा खेळण्यास वेळेचे बंधन असले, तरी अनेक ठिकाणी हे नियम धाब्यावर बसवून रात्री उशिरापर्यंत गरबा खेळला जातो. त्यानिमित्ताने तरुण तरुणी रात्री उशिरापर्यंत घराबाहेर असतात. नवरात्री काळात संतती नियमनाच्या साधनांची नेहमीच्या तुलनेत दुप्पट विक्री होते तसेच यानंतरच्या काळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या गर्भपाताच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते असेही एका सर्वेक्षणातून निदर्शनात आले आहे.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

## जन्म हा अखेरचा

अगस्त्य विचारतात की, 'प्रसादीस्थलाच्या उपस्थलांचे निरुपण मी ऐकले आहे. मला आता लिंग षटस्थलांतर्गत प्राणलिंगीस्थलांची उपस्थले श्रवण करण्याची इच्छा आहे. त्या विषयी मला सांगावे. श्रोत्यांच्या मनात जसजसे प्रश्न उभे राहतात आणि तो ते व्यक्त करतो तसातसा वक्ता अधिकाअधिक बोलत जातो. तेथे शास्त्र मौन धारण करते. प्रसादीस्थलाचे निरुपण ऐकल्यावर त्यापुढील प्राणलिंगीस्थलाचे निरुपण ऐकण्याची जिज्ञासा महर्षी अगस्त्यांच्या मनात उत्पन्न झाली. त्यांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठी जगद्‌गुरु रेणुकाचार्य म्हणाले, प्राणलिंगीस्थलात नऊ उपस्थले आहेत. आत्मस्थल, अंतरात्मस्थल, परमात्मास्थल, निर्देहागमस्थल, निर्भावागमस्थल, नष्टागमस्थल, आदिप्रसादीस्थल, अंत्यप्रसादीस्थल आणि सेव्यप्रसादीस्थल. यांपैकी एकेका स्थलाची लक्षणे तुला मी सांगतो.'

## सेव्यस्थल



पहिले स्थल आहे आत्मस्थल. संसारातून मुक्त होण्यासाठी प्रत्येक मनुष्याला आत्म्याचे स्वरुप जाणण्याची गरज आहे. मनुष्याला तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. परमात्मा, आत्मा आणि प्रपंच. या तीन पदार्थांविषयी माणसाच्या मनात जिज्ञासा असते. या तिन्हींशिवाय दुसऱ्या कशालाही अस्तित्व नाही. माणसाच्या मनात आत्म्याबद्दल जिज्ञासा असते. परमात्म्याबद्दल असते किंवा जगाबद्दल असते. यापैकी एकाचे परिपूर्ण ज्ञान जर झाले तर अन्य दोन्ही तत्वांचे ज्ञान आपोआप होते. तीन पदरांना पीळ देऊन दोरी वळली जाते, म्हणजे एक दोरीचे मुळात तीन भाग असतात. त्याप्रमाणे आपल्या विचारविश्वाचे जणू तीन भाग केलेले आहेत. आत्मा, परमात्मा आणि प्रपंच.

**(क्रमशः) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# सिक्कीममधील जलप्रलय आणि घेण्यासारखा बोध

सिक्कीममध्ये झालेल्या जलप्रलयाला एखाद दुसरे कारण असू शकत नाही. तापमानवाढीमुळे वितळणाऱ्या हिमनद्या, हिमस्खलन, भूकंप, मुसळधार पाऊस अशी प्रमुख कारणे असतात. सिक्कीममध्ये चौदा संभाव्य धोकादायक सरोवर आणि तीनशेहून अधिक हिमनदी तलाव आहेत. त्यातील लोनक सरोवरातील पाणी कमी करण्याचे सरकारी प्रयत्न अपुरे पडले.

जलप्रलयाला अनेक कारणे आहेत असे सांगितले जाते. तरीही निसर्ग आणि हवामान बदलाच्या मुळाशी पर्यावरणातील वाढता मानवी हस्तक्षेप, राक्षसी महत्वाकांक्षा याशिवाय विकासाच्या नावाखाली केला जाणारा पर्यावरणाचा विनाश हीच प्रमुख कारणे आहेत. सन १९९०मध्ये या सरोवरातील पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली. केदारनाथ दुर्घटनेनंतर नेमलेल्या समितीने २०१५ मध्ये संभाव्य धोक्यांची सूचना दिली होती. हिमालयीन पर्वतरांगांकडूनही धोक्यांचे अंदाज मिळत होते. परंतु त्यांच्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. केदारनाथ, जोशीमठ येथील दुर्घटना यांना हवामान बदल आणि हिमालयाच्या कुशीत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या विकास योजना यामुळे हिमालयाचे अंतरंग पोखरले जात आहे.

जोशीमठ येथील जमिनींना तडे गेल्याने तेथील नागरिकांना स्थलांतर करावे लागले. तर सिक्कीममध्ये रस्ते खचले, राजमार्ग बंद पडला, चार जिल्ह्यांतील हजारो नागरिक बेघर झाले. त्यांना सुरक्षित छावण्यात हलविण्यात आले. या कार्यात लष्कराची वाहने चिखलात रुतून बसली, लष्करी जवान आणि अंदाजे दीडशे नागरिक बेपत्ता आहेत. या जलप्रलयात उच्च क्षमतेचे वीज प्रकल्प पाण्यात गेले. जागतिक पातळीवरील नवी संशोधने जागतिक तापमान वाढीमुळे वितळणारे ग्लेशियर्स सरोवरातील पाणीसाठ्यात वाढ होण्यास कारणीभूत असतील असा अंदाज व्यक्त करीत आहेत. तरीही मानवी हव्यासापायी घडवून आणल्या जाणाऱ्या गरजांपलिकडील सुधारणा आणि अतिरिक्त इंधन वापर हे सर्व पर्वतराजींमध्ये ग्लेशियर्स वितळून हिमालयीन व अन्य पर्वतरांगाच्या आश्रयाने निवास करून राहणाऱ्या मानवी वसाहतींना धोका पोहोचवू शकतात. याकरिता तापमान वाढ आणि हवामान बदलांचे परिणाम यापासून बचाव करणे मानवांच्या हाती आहे.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

## - संतविचार -



**डॉ. देविदास गुरव, सोलापूर**

# 'मोगरा फुलला मोगरा फुलला'

**इवलेसे रोप लावियेले द्वारी ।**
**तयाचा वेलु गेला गगनावरी ।**
**मोगरा फुलला मोगरा फुलला ।**
**फुले वेचिता अतिभारू कळियासी आला ।**
**मनाचिये गुंती गुंफियेला शेला ।**
**बाप रखुमादेविवरु विठ्ठली अर्पिला ।।**

संत ज्ञानेश्वर रचित हा अभंग नितांत सुंदर असून सर्वांना सुपरिचित आहे. अभंगाच्या प्रत्येक चरणातून प्रतिभा संपन्नतेचा अक्षर सुगंध दरवळतांना दिसून येतो. माऊलीच्या सुप्रसिद्ध रचनेतून तत्वज्ञान, विज्ञान व भक्तीच्या अंगाने अनुभवाला येणारा निसर्गातील चमत्कार अभिव्यक्त झाला आहे. ते म्हणतात पहा!. काय आश्चर्य! एका वेलीचे लहानसे 'रोप' दारात लावले आणि पाहाता-पाहाता ती वेल आकाशव्याप्त झाली. इतकेच नव्हे त्या विशाल वेलीला इतकी 'मोगऱ्याची फुले' उमलली की कितीही वेचली तरी पुनःपुन्हा कळ्यांचा 'बहर' येत राहिला. तेव्हा ती फुलं मनाच्या धाग्यात गुंफुन एक सुंदर शेला तयार केला नि तो बापविठ्ठल चरणी अर्पण केला.

'इवले रोप' म्हणजे काय?, रोप कोणत्या प्रकारचा? 'मोगरा फुलला' चा अर्थ काय? आदी सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला माऊलीच्या निसर्ग काव्यात सापडतील. एका अर्थाने माऊलीच्या व्यापक व विशाल स्वानुभवाचे प्रकटीकरणच आहे. आत्मसाक्षात्काराचे गूढ उकलणारा अभंग वाचला की मन प्रसन्न होऊन जाते. माऊलीने दारातल्या एका लहानशा रोपाद्वारे हळूवारपणे विश्वनिर्मितीचे रहस्य आपल्यासमोर उलगडले आहे. त्यांचे शब्द सामर्थ्य इतके आहे की, जगताचा सारा पसारा या इवल्याशा रोपातून कळून येतो.

सबंध ब्रह्माडांत खूप मोठी सर्जक शक्ती भरून राहिली आहे. त्यामुळेच एका बीजाला अंकुर फुटतो, एक जीव जन्माला येतो, असंख्य जंतूंना जिवंत रूप प्राप्त होते. माऊलीने याच सर्जनशील शक्तीचे व्यापकत्व सिद्ध करून कौतुक केले आहे. वैज्ञानिक दृष्टीने जर विचार केला तर या एकाच अभंगात सृष्टीतील सजीवांची उत्क्रांतीच विशद केली आहे.

अभंग जरी लहान असला तरी अर्थाचे विशालत्व एका भागातून स्पष्ट करता येणार नाही. दिसायला साधा, सरळ, वाचायला अगदी सोपी रचना, परंतु अर्थ लावताना मोठी तारांबळ उडते. प्रत्येक ओळीतील लपलेल्या अर्थाचा विस्तार करताना कधीकधी बुद्धीची कार्यशक्ती खुंटल्यासारखी वाटते. या भागात माऊलीच्या अभंगाचा सरळ भावार्थ व सृष्टीनिर्मितीचे रहस्याचे थोडक्यात विवरण माझ्या अल्पमतीप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला आहे.

संतवाणीतील विचारांचे सामर्थ्य एवढ आहे की, आपली पंच ज्ञानेंद्रिये देखील त्यापुढे थिटी पडतात हे निश्चित. जीवसृष्टीची उत्पत्ती तत्व व त्याचे ज्ञान-विज्ञान याची उकल करणारा हा अभंग पाहिला की मन स्तंभित होते. इथे तार्किक बुद्धीच्या किंवा पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन जर विचार केला की, माऊलीच्या ठायी स्वानुभव सिद्धता किती होती हे लक्षात येते. विश्व विस्तारण्याधीते बीज रूपात होते. त्या पश्चात विश्व रोपटे लावले गेले. या ब्रह्माडांत सूर्य, त्याभोवती फिरणारे ग्रह तारे, अवकाशात पसलेले त्याचे महाकाय जाळे, कालांतराने पृथ्वीवर सजीवांचा अंडज, पिंडज, स्वेदज, उद्भिज असा विस्तार झाला.

मोगरा फुलावा त्याप्रमाणे पंचविषयात्मक जग वृध्दिंगत होत गेले, ते एवढे वाढले की प्रचंड भोग घेतला तरी ते संपेना. सर्व इंद्रिये थकून जातात. भोगणारा दमून जातो परंतु विषय मात्र न सरता आव्हान देत तसाच उभा राहिला आहे. म्हणून माऊली म्हणतात, 'मनाच्या साह्याने सर्व प्रकारच्या विषयांचा शेला गुंफुन विठ्ठल चरणी अर्पण करावा. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या संवेदनासह माऊलींच्या रचनेतून एक संवेद्य जग दृष्टींसमोर उभे राहाते. वरवर पाहाता या अभंगात अवकाश व्याप्त परमेश्वराचा एवढा व्यापक व विशाल अर्थ दडलेला आहे हे कळून येत नाही. त्याकरिता ज्ञानचक्षूच्या कक्षा रूंद कराव्या लागतात, तेव्हा कुठे माऊलींच्या प्रतिभा शक्ती व अनुभव सिध्दता याची प्रचिती येते. 'मी तुझा आणि माझ्याकडे जे जे आहे ते ते तुझेच' हीच माऊलीची भावना विश्वरूपाला समर्पित आहे. त्यांच्या समर्पित भावनेच्या वेलीचा भव्य-दिव्य विस्तार पाहिला की मन थक्क होते. थोडक्यात अध्यात्म म्हणजे मन आणि शरीराचे सृष्टी व त्याच्या निर्मिका सोबत तादात्म्य पावणे होय. कदाचित माऊलींना हेच या रचनेतून सांगावयाचे असेल! पुढच्या भागात भक्तीच्या अंगाने नवीन अभंगाचा आस्वाद घेऊ या!

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

# शारदीय नवरात्रौत्सवास प्रारंभ

## 'आई राजा उदे उदे'गजराने दुमदुमली अवघी नगरी

## ४०० पेक्षा जास्त मंडळांकडून शक्तीदेवीची प्रतिष्ठापना

सुराज्य/सोलापूर

**'आई राजा...उदे उदे..!' चा गजर, लेझीम, झांज, टिपऱ्यांचा सुरेख खेळ, गुलालाची मुक्त उधळण, डौलाने फडकणारे भगवे ध्वज अशा उत्साही आणि भक्तीमय वातावरणात वाजत गाजत मिरवणुका काढून सोलापूर शहर व परिसरात रविवारी विविध सार्वजनिक शक्तीदेवी उत्सव मंडळांनी शक्तीदेवी मुर्तीची प्रतिष्ठापना केली.**





शहर व परिसरात ४०० पेक्षा जास्त सार्वजनिक मंडळांनी शक्तीदेवीची प्रतिष्ठापना केली. मानाच्या श्री रूपाभवानी मंदिरात दुपारी घटस्थापनेने नवरात्र उत्सवात प्रारंभ झाला. भावसार समाजाची कुलदेवता हिगुलांबिका माता, उत्तर कसब्यातील श्री कालिकादेवी माता, लाड तेली समाजाची श्री जगदंबा माता, गोंधळी समाजाची श्री इंद्रभवानी माता आदी विविध शक्ती देवींच्या मुर्तीची पारंपरिक पध्दतीने प्रतिष्ठापना करण्यात आली. घरोघरी घटस्थापनेचे विधी दुपारी उशिरापर्यंत चालू होते. सर्वत्र भक्तीमय वातावरण दिसून आले.

सकाळपासून सार्वजनिक शक्तीदेवी मंडळाच्या प्रतिष्ठापनेच्या मिरवणुका सुरू होत्या. पांजरापोळ चौक, बाळीवेस, नवी पेठ, माणिक चौक, पूर्व भाग आदी ठिकाणी मिरवणुकांनी रस्ते फुलून गेले होते. बाळीवेस शक्तीदेवी मंडळाची मिरवणूक जल्लोषात निघाली. भव्य लेझीम पथक, भैय्या चौकातील गणपती हॉल मंडळाच्या लेझीम पथकाने एकापेक्षा एक सरस डाव सादर करून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. लोणारी गल्लीतील शिवशक्ती मंडळाने जल्लोषात मिरवणूक काढली. नवीपेठेतील शक्तीपूजा मंडळ, जयहिंद चौक नवरात्रौत्सव मंडळाच्या मिरवणुका उत्साही वातावरणात पार पडल्या.

### हिंगुलांबिका मंदिरात घटस्थापना



शारदीय नवरात्र महोत्सव प्रित्यर्थ गणेशपेठेतील भावसार समाजाची कुलस्वामिनी पहिले शक्तीपीठ हिंगुलांबिका देवी मंदिरात हिंदू धर्म रुढी परंपरेने पहाटे पाच वाजता गाभाऱ्याचा दरवाजा उघडण्यात आला. पहाटे साडे पाच ते सहा वाजेपर्यंत मंत्रपुष्पांजलीने अंबादास सुलाखे यांच्या हस्ते पंचामृत अभिषेक करण्यात आले. वस्त्र परिधान करून सुवर्ण अलंकार, पुष्पहार अर्पण करून भाविकांना दर्शनासाठी दरवाजा उघडला. सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत विविध धार्मिक विधीने मंदार भारत रेळेकर यांच्या हस्ते परिवारासह जय हिंगलाज मातेच्या जय घोषात घटस्थापना झाली. दुर्गा सप्तपदी पाठ प्रकाश कटारे यांच्या हस्ते झाले. विश्वशांती व लोककल्याणार्थ सुनील रामचंद्र अण्णे यांच्या हस्ते परिवारासह होमहवन प्रारंभ झाला. रात्रीचा विडा छबिना आरती विडा संकेत तुकाराम गर्जे यांच्या हस्ते करून नक्षत्र आरती विक्रांत संजय पतंगे यांनी केले. याप्रसंगी किशोर कटारे, सुर्यकांत महिंद्रकर, दत्तात्रय पुकाळे, यल्लप्पा महिंद्रकर, प्रा. श्रीकांत अंबुरे, समाज अध्यक्ष राजकुमार हंचाटे, उत्सव अध्यक्ष किसन गर्जे, मोहन क्षीरसागर, बाळासाहेब खमितकर, विजय पुकाळे, सुनील क्षीरसागर, प्रकाश जवळकर, बापू ढगे, सुहास क्षीरसागर, सुरेश महिंद्रकर,गणपत झिंगाडे, रोहित माळवदकर, अभिषेक रंपुरे, संजय हंचाटे, अंबादास गवनी उपस्थित होते.



### साहित्य खरेदीसाठी गर्दी

सोलापूरच्या बाजारपेठेत घटस्थापनेसाठी आवश्यक पूजासाहित्य खरेदीसाठी महिला भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. घटस्थापनेसाठी बोळकी, श्रीफळ, बदाम, खारीक, हळदीचे खांड, कापूर, टोपली, विड्याची पाने, काळी माती आदी पूजा साहित्य बाजारात विक्रीला आले होते. याशिवाय देवीला ९ दिवस फुलांची सजावट अनेक मंडळे करतात, त्यासाठी फुलांची आवकही मोठ्या प्रमाणात झाली आहे.

### शहरात २००० पोलिसांचा चोख बंदोबस्त

शक्तीदेवीच्या प्रतिष्ठापनेनिमित्त शहरात सुमारे २००० पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली ३ पोलीस उपायुक्त , ५ सहायक पोलीस आयुक्त, २० पोलीस निरीक्षक, ६५ सहायक पोलीस निरीक्षक-फौजदार, १०९८ पोलीस अंमलदार, राज्य राखीव दलाची एक तुकडी, ७०० होमगार्ड असा सुमारे २००० पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. बाजारपेठा व चौकाचौकात पोलिसांचे फिक्स पॉईंट्स असणार आहेत. नवरात्रौत्सव काळात शहरातील प्रमुख शक्तीदेवीच्या मंदिराजवळही पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. रुपाभवानी मंदिरात दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भक्तांसाठी सुरक्षिततेसाठी चोख बंदोबस्त असणार आहे.



## 'लोकमंगल'मध्ये स्पर्धा परीक्षासंदर्भात व्याख्यान

सुराज्य/सोलापूर

वडाळा येथील श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थी अतिश शिंदे (ज्युनिअर असिस्टंट, ग्रामीण बँक), प्रशांत लोंढे, संदेश लोकरे यांनी बँकिंग क्षेत्रात करिअर करण्यासाठी असणाऱ्या विविध परीक्षा, त्यासाठी असणारा अभ्यासक्रम, शैक्षणिक पात्रता याबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भविष्यासाठी बँकिंग क्षेत्रातील संधी व आव्हाने स्वीकारून या दृष्टीने योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्याच्या शंकाचे निरसन केले. सूत्रसंचालन प्रा. ज्योती गायकवाड, आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. सचिन फुगे प्राचार्य यांनी केले.

## बनशंकरी मंडळाचा रौप्यमहोत्सव; मिरवणूक जल्लोषात

### झळकले अवयव दान, देहदान, रक्तदान, स्त्री शक्ती, स्वच्छता संदेश फलक

सुराज्य/सोलापूर

शेळगी येथील बनशंकरी नवरात्र महोत्सव मंडळ व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त बनशंकरी मातेची प्रतिष्ठापनेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

यंदाच्या वर्षी घटस्थापनेच्या दिवशी बनशंकरी मातेची प्रतिष्ठापना मिरवणुकीचा शुभारंभ माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, केदारनाथ उंबरजे, चंद्रकांत रमणशेट्टी, श्री सिध्देश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, ट्रस्ट अध्यक्ष राजशेखर रोडगीकर, आधारस्तंभ सुरेश हत्ती, उत्सव समिती अध्यक्ष दीपक भैरप्पा, उपाध्यक्ष ओंकार देशेट्टी यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

**भारत माता, झाशीची राणीच्या वेभषुषेतील मुलींनी वेधले लक्ष**



मिरवणुकीत अग्रभागी घोड्यावर स्वार झालेल्या भारत माता व झाशीची राणी लक्ष्मीबाईच्या वेषभुषेतील मुली होत्या. त्यानंतर ३०० तरुणांचा लेझीम ताफा होता. त्यामागे अवयव दान, रक्तदान, देहदान, स्त्री शक्ती, स्वछता या विषयावरील संदेश फलक घेऊन कार्यकर्त्यांनी त्याचा जागर करण्यात आला. डोक्यावर जलकुंभ घेतलेल्या २०० पारंपारिक वेशभूषेतील महिलांचा सहभाग सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. आकर्षक अशा मंदिराची सजावट केलेल्या वाहनात बनशंकरी मातेची मनमोहक मूर्ती होती.

यावेळी माजी परीवहन सभापती महादेव पाटील, एम. के. फाऊंडेशनचे महादेव कोगनुरे, डॉ. सिध्देश्वर दुलंगे, अंबादास बिराजदार, डॉ. महेश दुलंगे, गुरुनाथ वांगीकर, रवी कोरे, भाऊ पारीख, राजेश सवळी, राजशेखर बुरकुले उपस्थित होते.

या मिरवणुकीसाठी अरुण सुरवसे, धीरज गौड, राहुल शाहबादे, विजयकुमार बिराजदार, विश्वनाथ होसाळे, महेश करपे, महेश होटकर, संजीव मळेकर, नरसिंह बांगड, गोवर्धन डिडवाणी, प्रदीप भोसले, बसवराज यलशेट्टी, बाळासाहेब नेसुरे, शांतय्या कडगंची, दिनेश तोग्गी, प्रथमेश शिरशीकर, शेखर स्वामी, संगमेश्वर पुराणिक, सिध्देश्वर हिरेमठ, अजय चारी, अभिषेक जाधव, काशिनाथ होटकर, निलकंठ पाटील, सुरेश चारी, प्रफुल शेट्टी, गुरुनाथ बिराजदार, राजू देवरमनी आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## तुळजापूर-शिंगणापूर महामार्गासाठी निघाली कावड यात्रा

### सर्वपक्षीयांचा समावेश

सुराज्य/टेंभुर्णी



तुळजापूर ते शिखर शिंगणापूर महामार्गाच्या मागणीसाठी माढा तालुक्यातील सर्वपक्षीय नागरिकांच्या तुळजापूर ते शिखर शिंगणापूर कावड यात्रेस आजपासून सुरुवात झाली. तुळजापूर येथे भवानी मातेचे दर्शन घेऊन या कावडयात्रेस आज दुपारी एक वाजता सुरुवात झाली आहे.

तुळजाभवानी आणि छत्रपती शिवाजी महाराजाचे आराध्य दैवत शंभू महादेव यांना जोडणारा हा महामार्ग होणे अत्यावश्यक आहे. यासाठी शासनदरबारी रेटा लावणे गरजेचे आहे. म्हणून जात धर्म पंत आणि पक्ष सोडून सर्वांची कावड यात्रा निघाली.

शंकर कारखाना सदाशिवनगर येथे ३ वाजता चहा, ६ वाजता शिखर शिंगणापूर येथे कावड यात्रेची सांगता होणार आहे. अशा प्रकारे शिवशक्ती महामार्गासाठी कावड यात्रा होणार आहे.

यासाठी संजय कोकाटे, दादासाहेब साठे, ॲड. बाळासाहेब पाटील, सुहास पाटील, अनिल पाटील, ज्ञानेश्वर सलगर, विनोद पाटील, औदुंबर महाडीक, डॉ. प्रदीप पाटील, योगेश पाटील, सुधीर पाटील, राजाभाऊ चवरे, राहुल पाटील, नितीन साठे, अजिनाथ माळी, विजय पवार, हनुमंत भोसले, संतोष लोंढे, सुरेश यादव, संतोष दळवी, राहुल जाधव, महेश पाटील, दीपक खोचरे, निवृत्ती तांबवे, नागेश गायकवाड, पोपट टॅगल, महारुद्र जाधव, बालाजी मोजमुले सचिन पाटील, प्रकाश चोपडे, संतोष यादव, राजाभाऊ यादव आदी परिश्रम घेत आहेत.

## यंदा 'भीमा'च्या सभासदांची 'दिवाळी' गोड होणार

### प्रति किलो २० रुपये दराने वाटप; विश्वराज महाडिक यांची माहिती

सुराज्य/सोलापूर

टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) येथील भीमा सहकारी साखर कारखान्याच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीच्या सणासाठी सभासद शेतकऱ्यांना प्रती किलो २० रुपये दराने साखर वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कारख्यान्याचे अध्यक्ष विश्वराज महाडिक यांनी दिली.



कारखाना कार्य क्षेत्रातील प्रत्येक गट ऑफिसवर बुधवार, दि. १८ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सभासद साखरेचे वाटप केले जाणार आहे.

साखर वाटपात सुसुत्रता येण्यासाठी सभासदांसाठी २५ किलो साखरेचे पॅकिंग करण्यात आले आहे. दरम्यान, सभासदांमध्ये कोणताही भेदभाव न करता मयत सभासदांच्या वारसांसह सर्वच सभासदांना साखर देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील बहुतांश कारखान्यांकडून सभासदांना साखर २५ ते ३० रुपये किलो दराने दिली जात आहे. अशा वेळी चेअरमन विश्वराज महाडिक यांनी सभासदांशी असणारा ऋणानुबंध जपत २० रुपये प्रति किलो दराने साखर देत सर्वांसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे.

आपल्याच उसापासून तयार झालेली साखर आपल्या घरचा दिवाळी फराळ गोड करणार, या भावनेतूनच यावर्षीचा उसदेखील सभासद भीमालाच गाळपास द्यावा, असे आवाहन महाडिक यांनी व्यक्त केले. चालूवर्षी ऐन नवरात्रौत्सवात दिवाळीसाठी देण्यात येणाऱ्या साखरेचे वाटप करण्यात येत आहे. सर्व सभासदासोबतच मयत सभासदांच्या वारसांनाही दिवाळीसाठी साखर वाटप करण्यात येणार आहे.

भीमाच्या सर्वच सभासदांनी दिवाळीची साखर संबंधित गट कार्यालयावरून घेऊन जाण्याचे आवाहन अध्यक्ष महाडिक यांनी केले आहे.

## माढ्यासाठी ९२ कोटींचा निधी उपलब्ध; रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार

सुराज्य/टेंभुर्णी

मतदारसंघातील माढा, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील समाविष्ट गावासाठी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विविध विकासकामांसाठी ९२ कोटी ३१ लाख रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारप्रसंगी जलतज्ज्ञ अनिल पाटील, टेंभुर्णीचे माजी सरपंच बलभीम लोंढे, हरिभाऊ माने उपस्थित होते.

यामध्ये नगर विकास योजनेंतर्गत रस्ते खडीकरण, डांबरीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण, बंदिस्त गटार आदी कामांसाठी महाळुंग, श्रीपूर नगरपंचायत व माढा नगरपंचायतींसाठी पन्नास कोटी, तांडा वस्ती विकास योजनेतून वीस कोटी, जलसंधारण योजनेतून पाझर तलाव दुरुस्तीसाठी पाच कोटी, आदिवासी विकास योजनेतून सहा कोटी सहा लाख, अल्पसंख्याक विकास योजनेतून माढा तालुक्यातील तीन गावांसाठी २५ लाख, तीर्थक्षेत्र विकास योजनेतून मंदिरासमोरील सभामंडप, वाहनतळ पेव्हर ब्लॉकसाठी ५० लाख, पाणंद रस्ते विकास योजनेतून रस्ते खडीकरण, मुरुमीकरण आदींसाठी ५० लाख, मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक परिसर सुशोभीकरण आदींसाठी चार कोटी, दलित वस्ती विकास योजनेतून कॉंक्रिटीकरणासाठी तीन कोटी मंजूर झाले आहे. यात माळशिरस १३ गावे, माढा ९ गावे, पंढरपुरातील ११ गावे समाविष्ट असल्याची माहिती भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भारत पाटील यांनी दिली.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ३८ सन २०२३-२४ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत असलेल्या कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता "**बी-१**" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | | दि. १६/१०/२०२३ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते ३१/१०/२०२३ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | निविदा पूर्व बैठक २५/१०/२०२३ मा. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात १२.०० वा. सदर निविदा पूर्व बैठक (Online via link generated) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | :- | दि. ३१/१०/२०२३ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर "**बीड लॉक**" झाल्यानंतर ७२ तासात "**हार्ड कॉपी**" १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. **१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | :- | **दि. ०३/११/२०२३** मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१). www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/-**
**(द.म.गावडे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(DGIPR/ROC-2023-24/5/C4162)

## संक्षिप्त वृत्त...



### सद्भावना मंच अध्यक्षपदी आगवणे

सोलापूर : शहरातील विविध सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सद्भावना मंचची स्थापना करण्यात आली. सर्वानुमते अध्यक्ष अशोक आगवणे यांची निवड केली. उपाध्यक्ष समीउल्ला शेख, उपाध्यक्ष युवराज शेळके, सेक्रेटरी शफिक काझी यांचीही निवड झाली.

जमाते इस्लामीच्या कार्यालयात ही बैठक झाली. सुरुवात अ. करीम यांच्या कुरआन पठणाने झाली. अध्यक्षस्थानी संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सय्यद रफिक पारनेर होते. प्रास्ताविक शफीक काझी यांनी केले. यावेळी संत रोहिदास विचारमंचचे अशोक आगवणे, अखिल भारतीय माळी समाजाचे अध्यक्ष शंकरराव लिंगे, समविचार संघटनेचे समीउल्ला शेख, संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम, अशपाक शेख, मकबुल ए आम ट्रस्टचे चेअरमन डॉ. रफिक सय्यद, ॲड. सैफन शेख यांनी मनोगत व्यक्त केले. यासाठी जमाते इस्लामी हिंदचे अध्यक्ष डॉ. इस्माईल शेख, हारुन शेख, जमीर कुडले, अ. मजीद शेख, उजैर रंगरेज, साकीब बागवान, मौ. अ. रहीम, एसआयओचे अ. करीम यांनी परीश्रम घेतले.



### नाभिक मंडळातर्फे जीवा महाले जयंती साजरी

सोलापूर : महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्यावतीने जीवा महाले यांची ३८८ वी जयंती मेकॅनिक चौक येथे उत्साहात साजरी झाली. यावेळी सर्वप्रथम मनामचे प्रदेश उपाध्यक्ष वैभव शेटे यांच्या हस्ते वीर योद्धा जीवा महाले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शेटे यांनी मनोगत व्यक्त करताना जीवा महाले यांचा इतिहास सांगितला.



### अभिनंदन विभुते पुरस्काराने सन्मानित

सोलापूर : ड्रीम फाऊंडेशन व डॉ. कलाम मिशनतर्फे विकासनगर येथील महावीर हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक अभिनंदन विभुते यांना राज्यस्तरीय डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी माजी खासदार अमर साबळे यांच्या हस्ते व इंचगिरी मठाचे उत्तराधिकारी पुष्पलता पाटील, राज्य उत्पादन शुल्काचे अधीक्षक नितीन धार्मिक, धनराज शिंदे, विजय बरबडे, समाज कल्याण अधिकारी सुजित खमीतकर, ड्रीम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी, सचिवा संगीता भतगुणकी उपस्थित होते.



### आयुष्यमान भारत कार्ड योजनेचा शुभारंभ

सांगोला : भारतीय जनता पक्षाच्यावतीने सांगोला तालुक्यातील डोंगर पाचेगांव येथे मोफत आयुष्यमान भारत कार्ड योजनेचा शुभारंभ करण्यात आला. भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्यावतीने सांगोला तालुक्यातील प्रत्येक गावात कॅम्प आयोजित करून प्रत्येक नागरिकाला आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड मोफत देण्यात येणार आहे. यावेळी संभाजी आलदर, दुर्योधन हिप्परकर, विष्णू सरगर,महादेव पुजारी, बीरा आलदार, विलास व्हनमाने, विठ्ठल कोळेकर, गब्बर कर्चे, पपू कर्चे, शिवाजी आलदर, अजित तवते, उत्तम सरगर, रवींद्र कांबळे, ग्रामपंचायत सदस्या विठाबाई कर्चे, मोहन घोडके, श्रीनिवास घोडके, मोहन बजबळे, सागर बजबळे, साहेबराव घोडके, बापू बिले, विजय घोडके, प्रकाश सकट, गोविंद सकट, हरी घोडके, साहेबराव घोडके, शंकर बिले, रमेश ढेंबरे, सनी दौड, ग्रामपंचायत सदस्य महादेव घोडके, विश्वास करडे, राहुल भजबळे, अर्जुन सुतार, आबा खताळ, वसंत कांबळे, संजय बिले, अभिजीत ढेंबरे उपस्थित होते.

### आदर्श शिक्षक पुरस्काराने भागनगरी सन्मानित



सोलापूर : जनसेवा शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.ए.पी.जे.अब्दुलकलाम उर्दू शाळेच्या उपशिक्षिका नसीमाबी वलीयोद्दीन भागनगरी यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ.काझी, महिबूब जैनोद्दीन तांबोळी, विलास कोरे उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक अशफाक सातखेड, शरीफाबी भागनगरी, असिमुन्निसा नबील शेख, ईजान नबील शेख, अदिबा भागनगरी, मोहम्मद शरीफ भागनगरी, भागनगरी नजीर, भागनगरी हलीमा मोहम्मद शरीफ यांनी अभिनंदन केले.

### वंचित बहुजन आघाडीच्यावतीने शहर संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

सोलापूर : वंचित बहुजन आघाडीच्यावतीने गुरुनानक चौक येथे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. श्रीशैल गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास प्रशांत गोणेवार, पल्लवी सुरवसे, सुरज आरखराव, गौतम बनसोडे, देवानंद उघडे, रोहित लालसरे, योगप्पा पुजारी, सुरज दिल्लीवाले, प्रफुल्ल दुपारगुडे, बाळासाहेब रणदिवे, सिध्दार्थ कांबळे उपस्थित होते. यासाठी आकाश फत्तेवाले, हर्षल कसबे, सनातन सोनवणे, सदानंद साबळे, अजय जेटीथोर, सुरज गायकवाड, विनायक चव्हाण, अप्पू हंजगी, हर्षल साबळे, विजय साळवे, रवी म्हेत्रे, किरण पोतराज यांनी परिश्रम घेतले.

# आवताडे शुगर यंदा साडेपाच लाख मेट्रीक टन उसाचे गाळप करणार

## आ. समाधान आवताडे यांची माहिती; बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा उत्साहात

सुराज्य/लक्ष्मीदहिवडी

यंदाही आवताडे शुगर हा इतर कारखान्यांपेक्षा अधिक दर देऊन ना नफा ना तोटा या तत्त्वावर केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी हा कारखाना चालवणार आहे. साडेपाच ते सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी बॉयलर अग्निप्रदीपन सोहळ्याच्या शुभारंभप्रसंगी दिली.

यावेळी भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत, संत दामाजी देवस्थानचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे, नवनाथ पवार, सोमनाथ आवताडे, द्रोणाचार्य हाके, प्रा. येताळा भागत, दत्तात्रय जमदाडे, अशोक केदार, सुरेश भाकरे, पप्पू काकेकर, बसवेश्वर पाटील, राजू बाबर, बाळासाहेब शिंदे, विजय माने, निला आटकळे, सुरेश पवार, विनायक यादव, बापुराया चौगुले, मोहन बागल, तुकाराम कुरे,रमेश भांजे, शिवाजी सरगर, धनंजय पाटील, सरोज काझी, कुर्मदास चटके, भारत निकम आदी उपस्थित होते.

प्रारंभी बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळ्याअगोदर सात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हस्ते सत्यनारायण महापूजा व होमहवन करण्यात आले. प्रास्ताविक आवताडे शुगरचे कार्यकारी संचालक मोहन पिसे यांनी केले. आभारप्रदर्शन सरव्यवस्थापक सुहास शिनगारे यांनी केले. याप्रसंगी समाधान हेंबाडे, खंडू खंडारे, मिलिंद आटकळे, डी. सी. जाधव, रावसाहेब राजमाने, सुधाकर फटे, आण्णासाहेब फटे, विष्णू बागल, सचिन हुंडेकरी, गंगाधर काकनकी, बादल सिंह ठाकूर, धीरज म्हमाणे, संदीप पाटील, भीमराव भुसे, सुरेश भाकरे, राजाभाऊ घायाळ, विवेक



खिलारे, बापू मेटकरी, किशोर जाधव, तात्या जगताप, नितीन करंडे, दत्तात्रय शिंदे, अविनाश मोरे, नारायण शिंदे, श्याम पवार, सुनील कमते, मोहन पवार, संभाजी फाळके, बजरंग जाधव, राहुल नागणे, तौहीद शेख, दामोदर रेवे, प्रताप मोरे, सोमनाथ धावणे, मनोज होलम, अभिजित पवार, निलेश रणदिवे, चंद्रकांत राठोड, रणजीत पवार, ज्ञानेश्वर बळवंतराव उपस्थित होते.



## श्रीनाथ विद्यालयात कीटकजन्य आजाराविषयी उद्बोधन

सुराज्य/श्रीपूर

बोरगाव (ता. माळशिरस) येथील श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार ऊर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगावमधील इयत्ता ५ वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांना कीटकजन्य आजाराविषयी उद्बोधन करण्यात आले. यावेळी डॉ. विजय बागल, प्राचार्य डी. जे.गाडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी एस.डी. देशमुख, डॉ. सुवर्णा चव्हाण, प्राचार्य डी.जे. गाडे, सतीश होले, नायकवडी, श्रीमती कुलकर्णी, खरात, शेख, गुरव, उपमुख्याध्यापक एम.एस. भुजबळ, पर्यवेक्षक आर.टी. लष्कर आदी शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस. गज्जम यांनी केले.

## अजनाळेतील पशुवैद्यकीय अधिकारीपद रिक्त

### कायमस्वरुपी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी

सुराज्य/सांगोला

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ अजनाळे येथील गेल्या दोन महिन्यांपासून पशुवैद्यकीय अधिकारीपद रिक्त आहे. त्यामुळे पशुपालकांना पशुवर उपचार करण्यासाठी या ठिकाणी सतत पशुवैद्यकीय दवाखना बंद असल्यामुळे पशुपालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पशुसंवर्धन विभागाचे महाराष्ट्र राज्याचे सचिव तुकाराम मुंडे यांनी लक्ष घालून संबंधित कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन धांडोरे यांनी केली आहे.

पशुवैद्यकीय अधिकारीच गावात नसल्यामुळे येथील पशुवैद्यकीय दवाखाना असून, अडचण नसून खोळंबा अशी दयनीय अवस्था झाली आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल जाधव यांची तात्पुरत्या स्वरूपात या उपकेंद्रामध्ये नियुक्ती केली गेली. परंतु ते गावात फिरकतच नसल्यामुळे पशुपालकांना पशुधन वाचवण्यासाठी खासगी डॉक्टरांकडे धाव घ्यावी लागत आहे.

> अजनाळे गावातील पशुवैद्यकीय अधिकारी पद गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून रिक्त आहे. आम्ही ग्रामपंचायत स्तरावरून मागणी करून सुद्धा आजपर्यंत पशुवैद्यकीय अधिकारी दिला नाही. या विभागातील आमच्याकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या. त्या तक्रारी संदर्भात खातेनिहाय चौकशी करून योग्य ती कारवाई करावी.
>
> -सुजाता विष्णू देशमुख
> माजी सरपंच, अजनाळे

## कस्तुरबाई कॉलेजचे युवा महोत्सवात यश

सुराज्य/सोलापूर



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवात कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनने यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाने महोत्सवात प्रहसन, प्रश्नमंजुषा, निर्मितीचित्र, वक्तृत्व, कथाकथन, काव्यवाचन व मेहंदी अशा सात स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला होता. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. निर्मितीचित्र स्पर्धेस संतोष प्रचंडे, आकाश कोळी, ऐमन मासुलदार, विजया नारायणकर यांनी द्वितीय पारितोषिक मिळवले. प्रश्नमंजूषा स्पर्धेत श्रेयश राऊत, अलीम शेख, ज्योती अरकेरी, ऐमन मासुलदार, अंजली दामजी, गौरी रोकडे, ज्योती अंबीगार, श्रीकांत मुंजे, अजय कमळे, आकाश कोळी, संतोष प्रचंडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. त्यांना महोत्सवाचे संघप्रमुख व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.दत्ता वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, प्राध्यापकांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हास्तरीय आट्या-पाट्या स्पर्धेत धर्मण्णा सादूल प्रशाला प्रथम

सुराज्य/सोलापूर

भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अल्पसंख्यांक पंजीकृत संस्था, सोलापूरमधील धर्मण्णा सादूल प्रशालेने जिल्हास्तरीय आट्या-पाट्या स्पर्धेत १७ वर्षाखालील वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षे मुलांच्या गटाने तृतीय तर १९ वर्षे वयोगटातील मुलींनी खो-खो स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना इब्राहीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे संस्थाध्यक्ष हारुन पठाण, सचिव शेख मुमताज, उपाध्यक्ष नाबिखा पठाण, मुख्याध्यापिका पठाण तस्लीमबानो, मुख्याध्यापिका सय्यद आफरीन यांनी अभिनंदन केले.

## डी.जे.क्लासेसच्या गरबा कार्यशाळेला प्रतिसाद

सुराज्य/सोलापूर

देवांशी अक्षय जव्हेरी यांच्या डी.जे.गरबा क्लासेसतर्फे आयोजित कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दरवर्षी गरबाची कार्यशाळा आयोजित केली जाते. गेल्या १५ वर्षांपासून जव्हेरी या बेसिक, ॲडव्हान्स गरबा, दांडिया, फ्री स्टाईल, दोधियू असे गुजराती पारंपरिक तथा लेटेस्ट स्टेप्स शिकवतात. आतापर्यंत पाच हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून गरबाचे धडे घेतले आहेत.

गेल्या तीन वर्षांपासून गुजरात येथून गरबा किंग व गरबा क्वीन यांना शिकविण्यासाठी आमंत्रित करतात. सोलापुरातील पहिले गुजराती फ्यूजन अल्बम त्यांनी निर्मित केले आहे. यावर्षी ट्रॅडिशनल, बेसिक आणि ॲडव्हान्स स्टेप्स शिकविण्यात आले. त्या स्व:ता प्रशिक्षित गरबा कोरिओग्राफर असून, त्यांनी गुजरात येथून गरबाचे धडे घेतले आहेत. शहरातील लोकांचा कल पारंपारिक गरबाकडे आणि नवरात्रीचे ९ दिवस देवीचे स्मरण करून त्याचा आनंद घेता यावा, हा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.




### वंचित बहुजन आघाडी उपाध्यक्षपदी शेख

सोलापूर : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर व महाराष्ट्र प्रदेश वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकुर यांच्या आदेशाने मो.शरीफ मौलासाब शेख यांची सोलापूर शहर वंचित बहुजन आघाडीच्या शहर उपाध्यक्षपदी निवड केली. त्यांचे निलेश गायकवाड, इलियास मुनशी, जावीद लुकडे, समीर उस्ताद, अजरोद्दीन शेख यांनी अभिनंदन केले आहे.

## स्वेरीच्या प्रा.नीता कुलकर्णी यांना पीएचडी पदवी प्राप्त

सुराज्य/पंढरपूर



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील प्रा.नीता प्रेमकुमार कुलकर्णी यांना 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ फ्लेग्झीबल मल्टी इनपुट अँड मल्टी आऊटपुट (एमआयएमओ) अँटेना फॉर फाईव्ह-जी एप्लिकेशन्स' या विषयात नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

त्यांनी आपला कोल्हापुरातील संजय घोडावत विद्यापीठामध्ये शोधनिबंध सादर केला होता. यानिमित्त त्यांचा विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांच्या हस्ते, प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

त्यांचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, आर.एम.लिनस, एन.बी.बहादुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, एम.एम. पवार, मिथुन मणियार, एन.डी. मिसाळ, सतिश मांडवे, अविनाश मोटे, मीनल भोरे, एन.डी. मिसाळ, सुरज रोंगे, महेश मठपती आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### युवचैतन्य मंडळ अध्यक्षपदी शिवाजी अलकुंटे



सोलापूर : साईबाबा चौकातील श्री युवचैतन्य नवरात्र महोत्सव मंडळांच्या अध्यक्षपदी शिवाजी अण्णा मारुती अलकुंटे यांची निवड करण्यात आली. तसेच अन्य पदाधिकारी निवडण्यात आले- प्रेसिडेंट अशोक दाते, सुभाष अलकुंटे, अंबादास वडनाल, अध्यक्ष किसन गोने, उपाध्यक्ष हिरालाल धोत्रे व भैय्या धोत्रे, सचिव तिप्पण्णा माने, सहसचिव राजू अलकुंटे, खजिनदार साईनाथ पोला, सहखजिनदार अंबादास देवरे, कोषाध्यक्ष सुदर्शन देवरे, शरणप्पा चौगुले, कार्याध्यक्ष अनिल वसंत दाते, संघटक प्रकाश चौगुले, प्रिन्स अलकुंटे, पुजा प्रमुख दयानंद श्रीमत पंतुलू, स्टेज प्रमुख अंबादास मानेकरी, विनायक गुंडेटी, मिरवणूक प्रमुख संतोष चौगुले, अशोक चौगुले, सल्लागार विजय धोत्रे, आकाश अलकुंटे, गजेली, नागेश भंडारी, प्रसिद्धीप्रमुख प्रकाश कोडूर, अंकुश दाते, कुंकू प्रमुख वसंत दाते, प्रल्हाद दाते, प्रमुख मार्गदर्शक भीमराव देवरे, कोळप्पा अलकुंटे.

## हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत होणाऱ्या रस्ते कामाच्या प्रकल्प अहवालास मान्यता

सुराज्य/टेंभुर्णी



आ. बबनराव शिंदे यांची माहिती

माढा विधानसभा मतदार संघातील हायब्रीड ॲन्युईटी योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत होणाऱ्या रस्ते कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मान्यता मिळाल्याची माहिती आ. बबनराव शिंदे यांनी दिली.

माढा विधानसभा मतदारसंघातील राज्यमार्ग २०१ माढा- उपळाई (बु.), बावी, मोडनिंब, करकंब, उंबरे, नेवरे, माळखांबी, वेळापूर ते प्रमा १५ रस्ता राज्य मार्ग ३९५ (माढा ते वेळापूर) व कंदर, दहिवली, निमगाव, पिंपळनेर, उजनी, वरवडे, परिते, बेंबळे, कान्हापुरी, उंबरे (पा), उंबरे(वे), नेवरे, नांदोरे, कुरोली, शेवते, भोसे, पांढरेवाडी, मेंढापूर, रोपळे, तुंगत, सुस्ते अशा मार्गावरील रस्ते कामास मंजुरी मिळाली आहे.

आ.शिंदे म्हणाले की, माढा विधानसभा मतदारसंघातील राज्यमार्ग २०१ माढा ते राज्यमार्ग ३९५ (माढा ते वेळापूर) या मार्गावरून अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. प्रवाशांची संख्या वाढल्यामुळे या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे. या मार्गाचा वापर तुळजापूर या तिर्थक्षेत्रास जाण्यासाठी भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत होणार आहे. कंदर, दहिवली, निमगाव, पिंपळनेर, उजनी, वरवडे, परिते, बेंबळे, कान्हापुरी, उंबरे (पा), उंबरे (वे), नेवरे, नांदोरे, पटवर्धन कुरोली, शेवते, भोसे, पांढरेवाडी, मेंढापूर, रोपळे, तुंगत, सुस्ते हा रस्ता पंढरपूर तिर्थक्षेत्रास मिळत असल्याने लाखो वारकरी या मार्गाचा वापर करीत आहेत. या भागामध्ये केळी, डाळींब, ऊस या सारख्या पिंकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत आहे. भागात एम.आय. डी.सी.मुळे औद्योगिक क्षेत्राला चालना मिळाली आहे. या दोन्ही रस्त्यांची सुधारणा झाल्यास या मार्गावरील अवजड वाहने, प्रवाशी व भाविकांना वाहतुकीच्या दृष्टीने सुलभता येणार आहे. या दोन्ही मार्गांचा हायब्रीड न्युईटी योजनेत समावेश करून या मार्गाची दर्जोन्नती करण्याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात आला होता.

त्यानुसार या रस्त्यांचे कामासाठी हायब्रीड न्युईटी योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास राज्य शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मान्यता मिळाली आहे. या रस्त्यांच्या कामाबाबत लवकरच पुढील कार्यवाही होणार आहे. या रस्त्यांच्या कामाच्या मंजुरीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

## ▶▶ थोडक्यात महत्त्वाचे



### जेकेएस कराटे स्पर्धेत ५० पदकांची कमाई

✔ **सोलापूर** : रेन्शी स्व. सुरेश जाधव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित पहिल्या राज्यस्तरीय जेकेएस कराटे पर्धेत सात रस्ता शाखेच्या खेळाडूंनी भरीव कामगिरी केली आहे. त्यांनी काता, कुमिते, ग्रुप काता, वेपन या प्रकारात १४ सुवर्ण, १६ रौप्य आणि २० कांस्यपदक अशी एकूण ५० पदकांची कमाई केली. त्यांचे रुद्रा ॲकॅडमी मार्शल आर्ट योगच्या संस्थापिका रेन्शी संगीता सुरेश जाधव यांनी अभिनंदन केले आहे. त्यांना आकाश झळकेनवरू, साहील जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये सिध्दराज कुलकर्णी ३ सुवर्ण, वेदांत गायकवाड २ सुवर्ण, रौप्य, राजवर्धन मोरे सुवर्ण, रौप्य, कांस्यपदक पटकावले. सृष्टी बशेट्टी सुवर्ण, रौप्य, कांस्यसह तीन पदके, श्रेयश कवीटकरने सुवर्ण, रौप्य, कांस्य, आयेशा हकीमने सुवर्ण, रौप्य, कांस्य, ऋषिकेश डोके याने २ सुवर्ण, अनुष्का लोकरेने २ सुवर्ण, कांस्य, अंजली कोळी सुवर्ण, कांस्य, साक्षी सौदागर ३ रौप्य, अखिलेश गायकवाड २ रौप्य, कांस्य, अन्वी शिंदे रौप्य, २ कांस्य, सदिच्छा भरले रौप्य, २ कांस्य, मोहम्मदी हकीम रौप्य, २ कांस्य, अयान शेख रौप्य, कांस्य, रणजित लोकरे रौप्य, कांस्य, स्वराज कुलकर्णी रौप्य, कांस्य, अलिशा हकीम २ कांस्य, श्रेया वाघमारे कांस्यपदक अशी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



### शालेय डॉजबॉल स्पर्धेत ४० संघांचा सहभाग

✔ **सोलापूर** : सोलापूर महानगरपालिका आणि जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय आयोजित शहरस्तरीय शालेय डॉजबॉल स्पर्धेत १७ आणि १९ वर्षे वयोगटातील ४० मुला-मुलींच्या संघाने सहभाग नोंदविला. उद्घाटन राजकुमार सुरवसे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी क्रीडा संघटक रविंद्र नाशीककर, सुदेश मालप, डॉ आनंद चव्हाण, शरण वांगी,प्रबुद्ध चिंचोळकर, अजित पाटील, आप्पासाहेब पाटील, सचिन गाडेकर, दत्तात्रय पाटील, फिरोज आदी उपस्थित होते. १७ वर्षाखालील मुलांमध्ये एस.आर. चंडक, दमाणी, सुयश, काडादी प्रशालेच्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुलींमध्ये काडादी, संगमेश्वर पब्लिक स्कूल, एस.आर.चंडक, दमाणी, सिध्देश्वर इंग्लिश मीडियमच्या संघानी यश मिळवले. १९ वर्षे वयोगटात सिध्देश्वर इंग्लिश मीडियम, संगमेश्वर महाविद्यालय, एस.आर. चंडक, काडादी प्रशानेने उत्कृष्ट कामगिरी केली.



### सोलापूरच्या साक्षी तोरणगीची कॅनडा येथील स्पर्धेसाठी निवड

✔ **सोलापूर** : श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्रशालेची माजी विद्यार्थिनी कराटे चॅम्पियन साक्षी सुरेश तोरणगी हिची कॅनडा येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचा लायन्स क्लबचे अध्यक्ष तथा जिल्हा तायक्कांदो असोसिएशन कौन्सिलचे अध्यक्ष मोहन भुमकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा सत्कार हरी ओम विणकर बाग, प्रभात योगा क्लासवतीने रजनी अवसेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी साक्षी तोरणगी, शोभा तोरणगी, जयश्री वाडीकर, सत्यनारायण पसनूर, नरसप्पा इंदापुरे, शंकर कनकी, नागेश्वर कन्ना, सोमशेखर भोगडे उपस्थित होते.

### भुवनेश्वरी बिराजदारचे मैदानी स्पर्धेत यश

✔ **सोलापूर** : जिल्हा क्रीडा कार्यालयाच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेतील १९ वर्षे मुलींच्या लांब उडी स्पर्धेत गौडगांव बु।। येथील श्री जगद्‌गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील भुवनेश्वरी बिराजदार हिने तृतीय क्रमांक मिळवला. तिला क्रीडाप्रमुख परमेश्वर व्हसुरे, विरेश धानशेट्टी, श्रीशैल सवळतोट, लक्ष्मीपुत्र देशट्टी, ईश्वर माशाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थाध्यक्ष, खा. डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, योगीराज हिरेमठ, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले, केंद्रप्रमुख भीमराव धडके, प्राचार्य कल्याणी देशट्टी यांनी अभिनंदन केले.



### एस.पी. प्रतिष्ठानच्यावतीने सामुदायिक विवाह सोहळा

✔ **सोलापूर** : भीम युवक क्रीडा मंडळ संचलित एस. पी. प्रतिष्ठानच्यावतीने दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केल्याची माहित माहिती संस्थापक समीर पांडगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सामुदायिक विवाह सोहळ्याचे यंदाचे हे सहावे वर्ष आहे. आत्तापर्यंत प्रतिष्ठानने ४५ जोडप्यांचा विवाह लावला आहे. या विवाह सोहळ्यात वधू-वरांना राजाराणी कपाट, मनी मंगळसूत्र, जोडवे, संसार उपयोगी साहित्य, विवाहाचे कपडे, भांड्याचा रॅक तसेच व-हाडी मंडळीसाठी भोजन व्यवस्थाही करण्यात येणार आहे. अधिक माहितीससाठी (९६६५५७१७११) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# ‘सिध्दनाथ’ने शेतकऱ्यांची विश्वासार्हता जपली : बिराजदार

## माने यांचा मोठेपणा; कार्यकर्त्यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ

✔ सुराज्य/सोलापूर



तिर्हे येथील सिध्दनाथ साखर कारखान्यामुळे दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर तालुका व सीना-भीमा पट्ट्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठी सोय झाली. नियोजनबध्द कामकाजमुळे शेतकरी विश्वासाने कारखान्यास ऊस पुरवठा करीत आहे, असे मत गंगाधर बिराजदार यांनी व्यक्त केले. तिऱ्हे येथील सिध्दनाथ कारखान्याच्या तेराव्या गळीत हंगाम बॉयलर प्रतिपादन समारंभात बोलत ते होते. यावेळी प्रथमेश पाटील, गंगाधर बिराजदार या शेतकरी दांम्पत्यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, उपाध्यक्ष डॉ.पृथ्वीराज माने, आप्पासाहेब काळे, शिवा होसाळे, चंद्रकांत खुपसंगे, नागेश बिराजदार, श्रीशैल पाटील, राम गायकवाड, सचिन गुंड, तोहीद पटेल, नागेश स्वामी उपस्थित होते. यावेळी माजी आ. दिलीप माने आपल्या कार्यकर्त्यांच्या हस्ते कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभांरभ करत मनाचा मोठेपणा दाखवून दिला. संपूर्ण कार्यस्थळावर याचीच चर्चा सुरू होती.

यावर्षी पावसाने शेतकऱ्यांचा मोठा अपेक्षाभंग केला. भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भिती व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत ऊस उत्पादकांचा ऊस गाळपासाठी वेळेत आणण्याचा कारखाना प्रयत्न राहील. या हंगामात सहा लाख टन ऊस गाळप करण्याचा मनोदय उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने यांनी व्यक्त केला.

आमच्यासारख्या सामान्य शेतकऱ्यांना बॉयलर प्रतिपादन समारंभास बोलावून केलेला सन्मानाबद्दल प्रथमेश पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी जनरल मॅनेजर संजय जाधव, प्रोजेक्ट मॅनेजर बाळासाहेब पाटील, मुख्य शेतकरी अधिकारी बाळासाहेब काळे, चीफ केमिस्ट धुळा शेंबडे, रामचंद्र वाकडे, धनंजय पाटील आदी उपस्थित होते.

# दीपकआबा एक दिवस अजितदादांनाही फसवणार

## प्रशांत बाबर यांची टीका

✔ सुराज्य/सोलापूर

विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीने उमेदवारी नाकारल्यानंतर दीपकआबा साळुंखे-पाटील हे अजित पवार यांच्या विरोधात वक्तव्य करीत होते. त्यांच्यामुळेच विजयसिंह मोहिते-पाटील राष्ट्रवादीपासून दूर केले. साळुंखे यांनी शरद पवारांना वारंवार फसवले आहे. एक दिवस ते अजितदादांना नक्कीच फसवतील, अशी टीका शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष प्रशांत बाबर यांनी केली आहे.



अजितदादा गटाने साळुंखे पाटील यांची जिल्हाध्यक्षपदी निवड केली. या पार्श्वभूमीवर प्रशांत बाबर यांनी एक पत्र काढले आहे.

या पत्रकाचा आशय असा की, शरद पवार आणि विजयदादांचे चांगले संबंध होते. मोदी लाटेत २०१४ मध्ये ही विजयदादा यांच्यामुळे राष्ट्रवादीची इज्जत राहिली. २०१९ च्या निवडणुकीत विजयदादांना पक्षापासून कसे दूर करता येईल, यासाठी साळुंखे यांनी सतत काम केले. जिल्हा परिषदेतील राष्ट्रवादीची सत्ता जाण्यासाठी साळुंखे हेच कारणीभूत आहेत. २०१९ च्या निवडणुकीत अजितदादांनी शेकापचे उमेदवार डॉ. अनिल देशमुख यांना पाठिंबा दिला होता. त्या काळात साळुंखे यांनी राष्ट्रवादीची साथ सोडत शहाजी पाटील यांना पाठिंबा दिला. त्यानंतर राज्यात महाआघाडीची सत्ता गेल्यानंतर शरद पवार, जयंत पाटील यांना फसवून दीपकआबा पुन्हा अजितदादांकडे गेले.



### बॉक्सिंग स्पर्धेत नेताजी प्रशालेचे यश

✔ **सोलापूर** : सोलापूर महानगरपालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय, क्रीडा परिषद व बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे आयोजित शालेय बॉक्सिंग स्पर्धेत नीलमनगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने सहा सुवर्ण, ११ रौप्य, ९ कांस्य पटकावले. विभागीय स्पर्धेसाठी सहा खेळाडूंची निवड झाली. त्यांना क्रीडा प्रमुख विठ्ठल कुंभार, सुर्यकांत बिराजदार, अशोक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अण्णाराव कुंभार, प्राचार्य रवीशंकर कुंभार, विजयकुमार हुल्ले, गौरीशंकर आळंगे यांनी अभिनंदन केले.

## सांगोला रोटरी क्लबतर्फे राष्ट्रीय पोस्ट दिवस साजरा

✔ सुराज्य/सांगोला



सांगोला येथील रोटरी क्लबच्यावतीने नुकताच राष्ट्रीय टपाल दिवस (पोस्ट-डे) साजरा करण्यात आला. सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान करुन त्यांच्या कामाबद्दल कौतुक करण्यात आले.

सांगोला पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर गायकवाड, चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रोटरियन माणिक भोसले यांनी पोस्ट खात्याचा इतिहास सांगितला. रोटरी क्लबच्यावतीने आयोजित केलेल्या पोस्ट डेच्या कार्यक्रमातच प्लॅस्टिक मुक्तीचा संदेश देण्यासाठी रोटरीच्यावतीने असा संदेश लिहिलेली एक पिशवीही भेट देण्यात आली. यावेळी डॉ. साजिकराव पाटील, हमीद शेख, बशीर, नागेश तेली, धनाजी शिर्के, ज्ञानेश्वर कमले, अमर जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. साजिकराव पाटील, आभार शरणप्पा हळ्ळीसागर यांनी मानले.




### रिक्षा उलटल्याने वृद्ध इसमाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : रिक्षातून प्रवास करताना रिक्षा उलटल्याने शिवाजी मारुती भोसले (वय-६५, रा. हिंगलजवाडी, जि. धाराशिव) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी मयत झाले. ते शुक्रवारी दुपारी तेर येथून आपल्या घराकडे टमटममधून प्रवास करीत होते. तेर येथील विद्युत मंडळाच्या कार्यालयाजवळ टमटम उलटल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना धाराशिव येथे प्राथमिक उपचार करून सतीश (मुलगा) यांनी सोलापुरात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### तावशी येथे विवाहितेस मारहाण

✔ **सोलापूर** : घरजागे संदर्भात कोर्टात दाखल केलेली केस मागारी घे, या कारणावरून काठी, हाताने केलेल्या मारहाणीत विवाहितेसह दोघेजण जखमी झाल्या. ही घटना तावशी (ता. पंढरपूर) येथे घडली. शीतल संतोष यादव (वय- ४५) आणि त्यांची मुलगी ज्ञानेश्वरी हे दोघे जखमी झाले. त्यात ज्ञानेश्वरीचे हात फ्रॅक्चर झाला. पंढरपूर तालुका पोलिसांनी जखमी शीतल यांचा दीर दादासाहेब अंबादास यादव आणि जाऊ मनिषा यादव या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यांनी सांगोला येथील घरजागेबाबत दाखल केलेली केस मागारी घे, असे म्हणत दोघींना मारहाण केली, अशी नोंद पोलिसात झाली. तपास हवालदार शिंदे करीत आहेत.

### दोड्डीजवळ उदमांजर, सायाळू ठार

✔ **सोलापूर** : हैदराबाद रोडवरील दोड्डी गावाजवळ झालेल्या अपघातात एक उदमांजर व एक सायाळू ठार झाले. मागील काही दिवसांपासून दर चार दिवसात एका वन्यजीवाचा मृत्यू होत आहे. वन विभागाने या ठिकाणी जाळी बसवावी अशी मागणी वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशनचे संतोश धाकपाडे यांनी केली. संतोष धाकपाडे हे कामानिमित्त हैदराबाद रोडवरुन जात होते. तिथे त्यांना एक उदमांजर व एक सायाळू मृत झाल्याचे दिसले. सायाळूच्या अंगावरुन वाहने गेल्याने त्याचा मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत दिसून आला. एकानेही एक वन्यजीव मृत झाल्याचे पाहून त्यांचा मृतदेह बाजूला केला नव्हता. त्यामुळे उदमांजराच्या रक्त, अंगावरी काटे रस्त्यावर पसरले होते. तर उदमांजराच्या डोक्याला जोराचा मार बसल्याने ते मृत झाले होते.

## श्री एकनाथी भागवत ग्रंथाचा गजारुढ ग्रंथ दिंडी सोहळा



✔ **पंढरपूर** : श्री एकनाथी भागवत गजारुढ ग्रंथ दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. हजारो वारकऱ्यांची उपस्थिती, ज्ञानोबा तुकाराम नामाचा गजर, ४५० टाळांचा गजर, ५१ मृदंगांचा निनाद, वारकरी पताका, जरी पटका, तुतारीचा नाद, व गजराजावर विराजमान हस्तलिखित श्री एकनाथी भागवत ग्रंथ अशा वैभवशाली पद्धतीने हा गजारुढ ग्रंथ दिंडी सोहळा झाला.

यावेळी श्री संत एकनाथ महाराज यांचे वंशज ह.भ.प योगिराज महाराज गोसावी, ह.भ.प श्री योगेश महाराज पालखीवाले, नामदेव महाराजांचे वंशज नामदास महाराज, तुकाराम महाराजांचे वंशज, देहूकर महाराज, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मुख्य मानकरी वासकर, गाथा मुर्ती राऊत, अंमळनेरकर, बडवे, हरिदास, उत्पात, सिध्दरस, बोधले, इंगळे, राशीनकर, नंधानकर महाराज, ठाकूर, चवरे, अलिबागकर, कबीर, बागडे, तारे महाराज उपस्थित होते.



### आर. जी. संस्थेतर्फे बुध्दांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना


✔ **सोलापूर** : आर. जी. मागासवर्गीय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून तथागत भगवान गौतम बुध्दांच्या आठ फुटी उंचीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करुन पुज्य भंते यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर बुध्द वंदना घेऊन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी पिंटू ढावरे, आदर्श सरतापे, गौतम गायकवाड, रविंद्र गवळी, प्रविण गायकवाड, प्रमोद नागटिळक, संजू गायकवाड, ईलाही सय्यद, श्रीकांत सावंत, प्रथमेश गायकवाड, बंटी तळभंडारे, अजय गायकवाड, बबलू ढावरे, सिध्दांत रणखांबे, तुषार जौंजट, अजय कांबळे, सुधीर बनसोडे, शंशीकांत माने, विशाल गायकवाड, दिंगबर वाघमारे, राजाभाऊ चव्हाण, दीपक कोप्पूल, आकाश कांबळे, सिध्दांत मसलखांब, आदी उपस्थित होते.

## रुई ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सोलनकर

✔ सुराज्य/टेंभुर्णी

रुई (ता.माढा) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पैलवान गणेश सोलनकर यांची बिनविरोध निवड केली. माजी उपसरपंच समाधान वाघमारे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त उपसरपंच पदासाठी पैलवान गणेश सोलनकर यांचा एकमेव अर्ज आला होता. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच विद्या बाळू धाईंजे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक समाधान सरडे यांनी काम पाहिले.

यावेळी सोनाली झिंजे, प्रियंका वाघमारे, कल्याण वाघमारे, पोपट कोळेकर, अक्षय ढवळे, गणेश पाटील, महेंद्र जगताप, सत्यवान केचे, अमोल गायकवाड, विकी ढवळे, गोपाळ सोलनकर, आकाश पाटील, मयूर काळे, अनिल लांडगे, रामचंद्र लांडगे, भाग्यवंत लांडगे, सिध्दार्थ वाघमारे, चंद्रकांत सोलनकर, लक्ष्मण सोलनकर, अंकूश महाडीक, राम सोलनकर, हनुमंत लोहार, तात्या झिंजे, पंढरी पांढरे, संदीप झिंजे, कुंडलिक झिंजे, संदीप कोळेकर, संतोष जानकर, पिंटू पवार, विजय कदम, रुपेश मुसळे, वैभव महाडिक, प्रवीण मिस्किन, मारुती लांडगे, दत्ता सोलनकर, आप्पा जाधव, राहुल तरंगे, अरविंद वजाळे, लक्ष्मण झिंजे, अशोक लांडगे उपस्थित होते.




# माळशिरस तालुका वकील संघटना अध्यक्षपदी नागनाथ शिंदे

### पांडुरंग लांडे यांची उपाध्यक्षपदी निवड

✔ सुराज्य/वेळापूर



माळशिरस तालुका वकील संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. नागनाथ शिंदे तर उपाध्यक्षपदी ॲड. पांडुरंग लांडे यांची निवड झाली.

सन २०२३-२४ सालासाठी माळशिरस तालुका वकील संघटनेची निवडणूक नुकतीच पार पडली. अत्यंत चुरशीच्या लढतीत अध्यक्ष पदासाठी ॲड. नागनाथ शिंदे तर उपाध्यक्षपदासाठी ॲड. पांडुरंग लांडे यांनी विजय मिळवला. दि. १३ ऑक्टोबर रोजी माळशिरस येथे संघटनेची मतदान प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये अध्यक्षपदासाठी ॲड. विलास पिसाळ व नागनाथ शिंदे यांच्यात लढत झाली. यामध्ये शिंदे यांना १३१ मते मिळाली. प्रतिस्पर्धी पिसाळ यांना १०५ मते मिळाली. उपाध्यक्ष पदासाठी पांडुरंग लांडे व राहुल लवटे यांच्यामध्ये झालेल्या लढतीत लांडे यांना १२४ तर लवटे यांना ११२ मते मिळाली तर एक मत बाद झाले. ४०० सदस्य असलेल्या वकील संघटनेमध्ये एकूण २५७ जणांना मतदानाचा अधिकार मिळाला होता. माळशिरस वकील संघटनेच्या निवडणुकीबाबत ॲड. प्रशांत रुपनवर यांनी याचिका दाखल करून निवडणुकीमधील अटी, शर्तीबाबत मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. त्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. डी.एस. आडत व त्यांचे सहाय्यक ॲड. कदम व ॲड. कोरे हे ॲड. मिलिंद देशमुख मुंबई यांच्यामार्फत याचिकेमध्ये हजर झाले होते. मात्र दरम्यानच्या काळात माळशिरस वकील संघटनेचे पदाधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून संघटनेच्या कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याची बाब सदस्यांच्या लक्षात आल्यावरून सदस्यांनी तातडीची बैठक बोलावून त्यामध्ये वकील संघटनेचे दप्तर सील केले होते. हंगामी अध्यक्ष म्हणून ॲड. एस.डी. नरुटे यांची नेमणूक करण्यात आली होती. संबंधित पदाधिकाऱ्यांनी चुकीचा पत्रव्यवहार व कागदपत्रात बदल केल्याचे बैठकीमध्ये समोर आल्याने संबंधित पदाधिकाऱ्यांचे अधिकार काढून घेण्यात आले होते. त्यानंतर दरम्यानच्या काळात सदरची याचिका ॲड. रुपनवर यांनी मागारी घेतली होती.

या निवडणुकीत सचिव पदासाठी ॲड. प्रशांत बिचुकले, सहसचिव पदासाठी ॲड. व्ही. एस. मंडले, खजिनदार पदासाठी ॲड. आर.एस. भोसले यांचे अर्ज राहिल्याने त्यांना बिनविरोध विजयी घोषित करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. डी.एस.आडत यांनी तर सहाय्यक म्हणून ॲड. जे.एस. कदम व ॲड. एस.एस.कोरे यांनी काम पाहिले.

## संक्षिप्त वृत्त...

### दिल्ली-एनसीआरमध्ये पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली :** एनसीआरसह उत्तर भारतात रविवारी दुपारी चारच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. ३.१ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाच्या धक्क्यांनी दिल्ली हादरली. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने दिलेल्या माहितीनुसार या भूकंपाचे केंद्र हरियाणाच्या फरिदाबादमध्ये जमिनीपासून १० किलोमीटर खोल होते. यापूर्वी ३ ऑक्टोबर रोजी राजधानी दिल्लीसह उत्तर भारतात भूकंपाचे धक्के जाणवले होते. त्या भूकंपाचा केंद्रबिंदू नेपाळमध्ये होता. राजधानी दिल्लीत ३ ऑक्टोबर रोजी भूकंपाचे धक्के जाणवले होते. त्यावेळी नेपाळमध्ये ६.२ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. या भूकंपामुळे दिल्ली एनसीआरसह उत्तर भारतातील अनेक भागांमध्ये हादरे जाणवले होते. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने दिलेल्या माहितीनुसार ३ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजून २० मिनिटांनी ४.२ रिश्टर स्केलचा पहिला भूकंप झाला. त्यानंतर ६.२ रिश्टर स्केलचा दुसरा भूकंप झाला. या भूकंपामुळे दिल्लीसह आसपासच्या भागात बराच वेळ जमीन हादरत होती.

### काँग्रेसच्या पहिल्या यादीत तीनही राज्यांतील प्रमुख मैदानात

**नवी दिल्ली :** काँग्रेसने मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि तेलंगणा या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून या राज्यांतील पक्षाच्या कप्तानांना रिंगणात उतरवण्यात आले आहे. मध्य प्रदेशमध्ये मुख्यमंत्रीपदाचे दावेदार कमलनाथ परंपरागत छिंदवाडा मतदारसंघातून निवडणूक लढवतील. छत्तीसगढमध्ये मुख्यमंत्री भूपेश बघेल व उपमुख्यमंत्री टी. एस. सिंह देव हे दोघेही आपापले बालेकिल्ले असलेल्या पाटन व अंबिकापूरमधून निवडणूक लढवतील. तेलंगणामध्ये प्रदेशाध्यक्ष व मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेतील प्रमुख नेता ए. रेवन्त रेड्डी यांना कोडंगल मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

### साताऱ्यात नवरा-बायकोची हत्या

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील आंधळी येथील निर्मनुष्य पवार दरा... शनिवार ७ ऑक्टोबर २०२३ रोजीची रात्री साडेदहाची वेळ... शेतातील पिकाला खतपाणी देण्यासाठी संजय पवार आणि पत्नी मनीषासह दोघे निर्मनुष्य पवार दरा येथे पोहचले. अन् काही वेळात दबा धरून बसलेल्या काळाने क्रूर डाव साधला. पवार पती-पत्नींना कळण्याअगोदरच त्यांच्यावर अंगावर तीक्ष्ण हत्याराने सपासप वार झाले. हे वार डोके, मान आणि गळ्यावर जबरी मार बसल्याने ते जागेवरच गतप्राण झाले. या दोघांच्या किंकाळ्या ऐकायलाही तिथे मारेकरीशिवाय दुसरे कोणीच नव्हते. त्यामुळे त्यांनी तेथेच तडफडून अखेरचा श्वास घेतला.

### पोलिस अधिकाऱ्याच्या मुलांचा राडा; दुकानात घुसून मारहाण

**नागपूर :** पोलिस अधिकाऱ्याच्या मुलांनी दुकानात घुसून तोडफोड करून कर्मचाऱ्याला मारहाण केली. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. अजिंक्य विजय नेमाडे आणि त्याचा भाऊ जित (रा. वानाडोंगरी), अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. मंथन राजू ढाकूलकर (वय २४, रा. वानाडोंगरी) याने दिलेल्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला. या तोडफोडीची चित्रफीत समाजमाध्यमांवरही व्हायरल झाली. अजिंक्यचे वडील विजय नेमाडे हे सीताबर्डी पोलिस ठाण्यात उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत.

### पुढील आव्हानासाठी तयार आहात? : इस्रायल पंतप्रधान

**नवी दिल्ली :** गेल्या शनिवारी पॅलेस्टाईनमधील दहशतवादी संघटना हमासने गाझापट्टीतून इस्रायलवर रॉकेट हल्ला केल्यानंतर दोन्ही देशांमध्ये युद्ध पेटले आहे. यानंतर इस्रायलने युद्धाची घोषणा करत गाझापट्टीपर प्रचंड बॉम्बवर्षाव केला आहे. इस्रायल-हमास संघर्षात आतापर्यंत हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे. तर असंख्य लोक जखमी झाले आहेत. हे युद्ध सुरू असताना शनिवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी गाझापट्टी सीमेवर जाऊन इस्रायल संरक्षण दलाच्या जवानांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सैन्यांचे मनोबल वाढवले.

### एकनाथ खडसेंची उदयनराजे भोसलेंवर खोचक प्रतिक्रिया

**जळगाव :** भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी अलीकडेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या राजकीय निवृत्तीवर भाष्य केले होते. शरद पवारांनी मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहावे, असे उदयनराजे म्हणाले होते. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांनी उदयनराजेंना प्रत्युत्तर दिले आहे. उदयनराजे यांनी आधी राजकारणातून निवृत्त व्हावे, असा टोला एकनाथ खडसे यांनी लगावला. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. उदयनराजे यांनी शरद पवारांबद्दल केलेल्या वक्तव्यावर प्रत्युत्तर देताना एकनाथ खडसे म्हणाले, केंद्र सरकारची ज्येष्ठ नागरिकाची व्याख्या लक्षात घेतली तर ६० वर्षांवरील जेवढे लोक असतील ते सर्वजण सेवानिवृत्त होतात. त्यामध्ये उदयनराजेही बसतात. त्यामुळे उदयनराजेंनी एक ठरवलं पाहिजे की, आता मी ज्येष्ठ नागरिक झालो आहे, आता राजकारणात मलाही रस नाही. शरद पवारांना जसे राजकारणातून निवृत्त व्हा, अशा सूचना दिल्या जातात. तसेच ६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या सर्व नेत्यांना राजकारणातून निवृत्त करण्याबाबत योग्य तो निर्णय सरकारने घ्यावा.

### अजय पूरकर यांनी साकारली खलनायकाची भूमिका

**मुंबई :** नाणं खणखणीत असलं की, ते कुठेही वाजतंच. त्याला मग भाषा,प्रांत, प्रदेश यांच्या मर्यादा राहत नाहीत. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या सुभेदार' चित्रपटाने आणि सुभेदारांची व्यक्तिरेखा साकारणाऱ्या अभिनेते अजय पूरकर यांनी प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आपल्या जबरदस्त अभिनयाच्या जोरावर अजय पूरकर यांनी दाक्षिणात्य सिनेसृष्टीलाही भुरळ घातली आहे. स्कंदा' या दाक्षिणात्य ॲक्शन चित्रपटात अभिनेते अजय पूरकर खलनायकाच्या जबरदस्त भूमिका साकारली आहे.विशेष म्हणजे अजय पूरकर यांनी पावनखिंड' चित्रपटात साकारलेली बाजीप्रभू देशपांडे यांची भूमिका तेलुगू दिग्दर्शक बोयापती श्रीनिवास यांना प्रचंड आवडली.

# समृद्धी महामार्गावर अपघातात १२ जणांचा मृत्यू

## आरटीओ अधिकारी जबाबदार; दोघांचे निलंबन, सदोष मनुष्यवधाचा गुन्हाही दाखल

**सुराज्य/मुंबई**

समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातासाठी आरटीओ अधिकारी जबाबदार असल्याचे सांगत दोन अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. या दोन अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रदीप राठोड, नितीनकुमार गणोरकर असं या निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नाव असून, दोघेही आरटीओ असिस्टंट इन्पेक्टर आहेत.



ड्रायव्हर पोलिसांच्या ताब्यात असून दोनही आरटीओ अधिकाऱ्यांचा पोलीस शोध घेत आहेत. अपघात होताच आरटीओ अधिकारी त्या ठिकाणाहून पळून गेले मग नंतर परत येऊन त्यांनीच अपघात झाल्याचा फोनही केला असल्याची माहिती पोलिसांकडून मिळते आहे.

समृद्धी महामार्गावर शनिवारी रात्री झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला आहे तर इतर २३ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये लहान मुलांचाही आहे. नाशिकहून बुलढाण्याच्या सैलानी बाबाच्या दर्शनाला गेलेल्या पर्यटकांच्या ग्रुपवर काळाने घाला घातला. या अपघाताला आरटीओ अधिकारीच जबाबदार असल्याचा आरोप अपघातग्रस्तांनी केला होता. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

### कसा घडला नेमका अपघात?

बुलढाण्याहून वैजापूर मार्गे निघालेल्या या ट्रॅव्हल्स बसमध्ये एकूण ३६ प्रवासी होते. हे सर्वजण बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी बाबा दर्गाचे दर्शन करून पुन्हा नाशिककडे परत निघाले होते. ज्यात काही लहान मुलांचा देखील समावेश होता. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरच्या समृद्धी महामार्गावर आल्यावर बसच्या पुढे एक ट्रक चालत होता. यावेळी जांबरगाव टोलनाक्याजवळ ट्रकला अचानकपणे एका आरटीओच्या पथकाने हात दाखवत थांबण्याचा इशारा केला. यामुळे ट्रक चालकाने जागेवरच ब्रेक मारला. त्यामुळे मागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रॅव्हल्स बस चालकाला काही कळायच्या आत ट्रॅव्हल्स बस ट्रकवर जाऊन धडकली. हा अपघात एवढा भीषण होता की, ट्रॅव्हल्स बसच्या पुढच्या भागाचा अक्षरशः चुराडा झाल्याचे दिसून आले. मात्र यात पुन्हा एकदा बारा निष्पाप जीवांचा बळी गेला आहे.

नाशिक जिल्ह्यातील ३५ भाविक बाबा सैलाणीच्या दर्शनासाठी गेले होते. ते तेथून परतत असताना वाहनाला अपघात झाला. टेम्पो ट्रॅव्हल्सची उभ्या ट्रकला धडक बसली. समृद्धी महामार्गाच्या वैजापूर येथील जांबरगाव टोल नाक्याजवळ ही घटना घडली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाखांची मदत जाहीर केली. तसेच जखमींवर शासकिय खर्चांनी उपचार करण्याचे निर्देश दिलेत तर पंतप्रधान मोदींनीही यावर शोक व्यक्त केला. पंतप्रधानांनी मृतांच्या नातेवाईकांना दोन लाखांची मदत जाहीर केली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक मनीष कालवानिया यांनी दिली. आरोपी ड्रायव्हर ब्रिजेशकुमार याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरटीओ अधिकारी प्रदीप राठोड, नितीनकुमार गणोरकर यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

# रेल्वेतून ८७ हजारांचा ऐवज लंपास

**सुराज्य/कुर्डूवाडी**

रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेच्या झोपेचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने ८७ हजारांचा ऐवज असलेली बॅग लंपास केली. कुर्डुवाडी-लातूर स्थानकादरम्यान ही घटना घडली. याबाबत इशरत अलिम शेख (पुणे) यांनी कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केलाआहे.




फिर्यादी महिला मुंबई- बिदर एक्सप्रेसने (कोच नं एस -३ मधून बर्थ नं २३ ,३१) प्रवास करीत होत्या. कुर्डुवाडी ते लातुर स्थानकादरम्यान पहाटेच्या सुमारास फिर्यादीची १० ग्रॅम वजनाचे ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे नेकलेस, २ हजार ४०० रूपयांचा चांदीचा छल्ला, रोख ८ हजार रुपये, २० हजार ९९९ रूपयांचे मोबाईल, ३५० रूपयांचे अरेबिक कुराण व इतर कागदपत्रे असा एकूण ८६ हजार ७४९ रूपयांचा ऐवज असलेली बॅग पळवली. तपास सहा.पो. नि.दत्ताजीराव देसाई हे करीत आहेत.

# शहरात दोन ठिकाणाहून चोराने मोबाईल पळवले

**सोलापूर :** शहर व परिसरात चो-यांच्या घटना सुरूच असून दोन ठिकाणाहून चोरट्याने मोबाईल लंपास केले आहेत.

पहिल्या घटनेत आसरा चौकातील आरोग्य हॉस्पिटलच्या बाजूला पूजेचे साहित्य विक्रेत्या जवळून १६ हजारांचा मोबाईल लंपास केला आहे. याबाबत आरती अनिल भोसले (वय-२८ रा. कुमारनगर,मजरेवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. फिर्यादी या रस्त्याच्या कडेला विक्रेत्याकडून पूजेचे साहित्य खरेदी करीत असताना चोरट्यांनी त्यांचा १६ हजारांचा मोबाईल लंपास केला. अधिक तपास पोलीस नाईक शिर्के हे करीत आहेत.

दुसरी घटना जुळे सोलापुरातील डीमार्ट येथील पाण्याच्या टाकीजवळ घडली. याबाबत माणिक मारुती राऊत (वय-५८, रा पद्मजा पार्क, जुळे सोलापूर) यांनी अज्ञात चोरट्याच्या विरोधात विजापूर नाका पोलिसात तक्रार दिली आहे. फिर्यादी हे रोडच्या कडेला पुजेचे साहित्य खरेदी करत असताना त्यांचा २५ हजारांचा मोबाईल चोरट्याने लंपास केला आहे. अधिक तपास पोलीस नाईक शेख हे करीत आहेत.

**मीरा बोरवणकर यांच्या पुस्तकात गौप्यस्फोट**

# नाव न घेता अजित पवार यांच्याकडे रोख




- येरवडा पोलीस ठाण्याच्या तीन एकर जागेचा प्रश्न
- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फेटाळले आरोप

**सुराज्य/पुणे**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण पुण्याचे माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांनी लिहिलेल्या पुस्तकातून अजितदादांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. मीरा बोरवणकर यांच्या 'MDM COMMISSIONER' या पुस्तकातून सरकारी जमीन खासगी व्यक्तीला देण्याचा डाव तत्कालीन पालकमंत्र्यांचा होता असा गौप्यस्फोट करण्यात आला आहे. सरकारी जमिनींचा लिलाव करून ती खासगी व्यक्तीला देण्यासाठी पालकमंत्री दादा यांचा आग्रह होता, असे बोरवणकरांनी लिहिले आहे. त्यामुळे राज्यात नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

मीरा बोरवणकरांनी पुस्तकात म्हटले की, पुण्याच्या पोलीस आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर मी तात्काळ कारभार हाती घेतला. शहरातील गुन्ह्यांचा आढावा घेतला, विविध अधिकाऱ्यांना भेटले. अशावेळी मला विभागीय आयुक्तांचा फोन आला. त्यांनी पालकमंत्री तुमच्याबाबत विचारताय, तुम्ही एकदा त्यांना भेटावे असे म्हटले.




### आरआर पाटलांबद्दल जे बोलले ते सांगू शकत नाही

बोरवणकरांनी पुस्तकात लिहिलेले आहे की, नकाशा फेकल्यानंतर पालकमंत्र्यांनी रागात तेव्हाचे महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्याबद्दल अशी अनेक विधाने केली, जी न सांगितलेलीच बरी. त्यानंतर मी पालकमंत्र्यांना सॅल्यूट करून निघून गेले, असा दावा त्यांनी पुस्तकात केलेला आहे.

# गोपाळपूर येथे खुरपीने मारहाण; महिलेसह दोघांविरुद्ध गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

गटारीचे घाणपाणी आपल्या घराजवळ सोडण्याच्या कारणावरून खुरपी आणि हाताने केलेल्या मारहाणीत सिद्धेश्वर बळीराम ननवरे (वय-३८ रा. मातोश्रीनगर गोपाळपूर, ता.पंढरपूर) हे जखमी झाले.

या प्रकरणात पंढरपूर तालुका पोलिसांनी शेजारी राहणाऱ्या दिनेश रामचंद्र हिंगमिरे आणि रोहिणी ज्योतिर्लिंग हिंगमिरे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार देशमुख पुढील तपास करीत आहेत.

**नीलमनगर येथे उलट्या झाल्याने तरुणाचा मृत्यू**

**सोलापूर :** नीलमनगर येथे पाणी पिल्यानंतर उलट्या होऊन तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. योगेश दत्तात्रय वाघमारे (वय-२६ रा.नीलम नगर ) असे मयताचे नाव आहे. रात्री आठ वाजता सुमारास घरात पाणी पिल्यानंतर त्याला उलटीचा त्रास होऊन बेशुद्ध झाला होता. त्याला आकाश माने (शेजारी) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपसारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

**चक्कर घेऊन पडल्याने वृद्ध इसमाचा मृत्यू**

**सोलापूर :** चक्कर येऊन पडल्याने महादेव भिमशा कोरे (वय-८५ रा. कुमठे ता. दक्षिण सोलापूर) हे उपचारादरम्यान रविवारी पहाटे मयत झाले. शनिवारी घरात असताना चक्कर येऊन खाली कोसळले होते. डोक्यात मार लागल्याने त्यांना कृष्णा (मुलगा) यांनी शासकिय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल केले होते.उपचारादरम्यान ते आज पहाटे मयत झाले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

**चहाच्या पातेल्याने मारून डोके फोडले**

**सोलापूर :** पैशाच्या व्यवहारातून चहा करण्याच्या पातेले आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत दिनेश हरिभाऊ माळी (वय-३० रा.मल्लिकार्जुन नगर,अक्कलकोट रोड) हा तरुण जखमी झाला. ही घटना शहरातील शांतीचौक पाणी टाकीजवळील चहाच्या टपरीजवळ घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पैशाच्या व्यवहारातून त्याला सोमनाथ तावडे याने मारहाण केली. अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

**अनोळखी वाहनाच्या धडकेत कृषी अधिकाऱ्याचा मृत्यू**

**सोलापूर :** अनोळखी वाहनाच्या धडकेने दुजाकी वरील निलंगा येथील कृषी विस्तार अधिकारी गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले. हा अपघात लातूर येथील गरुड चौकात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडला.

विशाल गोवर्धन ढाकणे (वय- ३५ रा.कृषी महाविद्यालय, लातूर) असे मयताचे नाव आहे. ते काल सायंकाळी ६ वाजेच्या घरातून विवेकानंद चौक येथे निघाले होते. गरुड चौकाजवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना लातूर येथे प्राथमिक उपचार करून संघर्ष शृंगारे (मित्र) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात रात्री दाखल केले होते. मात्र ते उपचारापूर्वी मयत झाले.

मयत विशाल ढाकणे हे निलंगा येथे कृषी विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. या अपघाताची प्राथमिक नोंद सिव्हील पोलीस चौकीमध्ये झाली आहे.

# जबरी चोरीसह मोटरसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस

## १ लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त

**सुराज्य/सोलापूर**

जबरी चोरीचे दोन गुन्हे व मोटरसायकल चोरीचा एक गुन्हा असे तीन गुन्हे उघडकीस आणून १ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

फिर्यादी अंबिका रवी पुजारी (वय-२७,रा.धोत्रेकर वस्ती) या व त्यांची नणंद नंदा कानकुर्ती यांच्यासोबत कॅनरा बँक, चाटी गल्ली येथे बचत गटाचे पैसे जमा करण्यासाठी जात असताना दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास जतकर वस्तीमधील दाळ मिल समोरून प्रियंका चौकाकडे जात होत्या. त्यावेळी त्यांच्या समोरून मोटरसायकलवर आलेल्या एका अनोळखी इसमाने अंबिका पुजारी यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून हिसका मारून चोरून निघून गेला. या घटनेसंदर्भात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासो मोरे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यावेळी अंमलदार इम्रान जमादार, विनोद रजपूत यांना रेकॉर्डवरील चैन स्नॅचर सराईत गुन्हेगार सलीम शेख हा शांती चौक, अक्कलकोट रोड पाण्याच्या टाकीकडे असल्याची बातमी मिळाली.त्यावेळी पथकाने सापळा लावून सलीम ऊर्फ सलीमोद्दीन अफजल शेख (वय-५३,रा.कसंबरी नगर) याला ताब्यात घेतले असता,त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

# बसवारूढ महास्वामीजींच्या पुण्याराधना सुवर्ण महोत्सवास प्रारंभ

## विश्वशांती, समाज समृद्धीसाठी होमहवन: बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

श्री.श्री.श्री. सद्‌गुरु बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्ट आयोजित ५० व्या पुण्याराधना सुवर्ण महोत्सवास रविवार, दि. १५ ऑक्टोबरपासून धार्मिक कार्यक्रमांनी प्रारंभ झाला. विमानतळामागील कस्तुरबा नगरातील मठात दि. २४ ऑक्टोबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम चालणार आहेत.

रविवारी सकाळी प्रारंभी मठाधिपती ईश्वरानंद महास्वामी यांच्या हस्ते प्रणव ध्वजारोहण झाले.

बसवारूढ महास्वामीजी यांच्या समाधीस ईश्वरानंद महास्वामी यांच्या हस्ते रुद्राभिषेक झाला. तसेच श्री राजराजेश्वरीदेवी श्रीयंत्र नवारण पूजा झाली. घटस्थापना, चंडी होम करण्यात आला. शिवपुत्र महास्वामीजी यांनी देवी माहात्म्य ग्रंथाच्या पारायणाची सुरुवात केली. देवीची पूजा आणि महाआरती झाली. यावेळी भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.



### विश्वशांती, समाज समृद्धीसाठी श्री चंडीहोम

बसवारूढ महास्वामीजींच्या ५० व्या पुण्याराधना सुवर्ण महोत्सवानिमित्त विश्वशांती, समाज समृद्धीसाठी दि. २३ ऑक्टोबरपर्यंत दररोज सकाळी ७ वाजता श्री चंडीहोम करण्यात येणार आहे, असे शिवपुत्र महास्वामीजींनी सांगितले.

### पालकमंत्री चंद्रकांतदादा मठाला देणार भेट

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे अध्यात्मिक गुरू मठाधिपती ईश्वरानंद महास्वामीजी आहेत. बसवारूढ महास्वामीजी मठाचे गेल्या अनेक दशकांपासून ते भक्त आहेत. पालकमंत्री झाल्यापासून त्यांचा हा पहिलाच सोलापूर दौरा आहे. या दौऱ्यात पालकमंत्री चंद्रकांत पाटील आज सोमवारी मठाला भेट देणार आहेत.




# भाजपाला विजयी हॅट्ट्रीक कोण मिळवून देणार ?

## सातपुते, साबळे की पुन्हा महास्वामी ?

**आगामी सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी केवळ पाच महिन्यांचा कालावधी राहिला आहे सलग दोन वेळा विजय मिळवल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तिसऱ्यांदा विजय मिळवून हॅट्रिक करण्याची भाजपची जोरदार तयारी सुरू आहे. त्यामुळे सोलापूर लोकसभा जिंकणे भाजपसाठी आता प्रतिष्ठेचा विषय बनला आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी सोलापूर लोकसभेसाठी आमदार राम सातपुते, माजी खासदार अमर साबळे यांचे नाव प्रामुख्याने चर्चिले जात होते. मात्र मोहोळ येथील दौऱ्यात अचानक खासदार डॉक्टर जयसिद्धेश्वर महास्वामी आपण पुन्हा एकदा या मतदारसंघातून इच्छुक असल्याचे सांगितल्यामुळे उमदेवारी कोणाला मिळणार याबाबत चुरस निर्माण झाली आहे.**

सोलापूर लोकसभा भाजपने २०१४ आणि २०१९ मध्ये मोठ्या फरकाने जिंकून काँग्रेसचा पराभव केला. या दोन्ही पराभवांमधून काँग्रेस अद्यापही सावरलेली नाही. २०१४ मध्ये शरद बनसोडे यांनी तर २०१९ मध्ये डॉक्टर जय सिद्धेश्वर महास्वामी यांनी सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव केला. मात्र डॉक्टर महास्वामी यांच्या विजयानंतर त्यांचा जातीचा दाखला खोटा असल्याचा आरोप केला गेला. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. खासदार महास्वामी यांच्यावर जात चोरल्याचा आरोप झाल्यामुळे गेल्या काही वर्ष- दोन वर्षापासून महास्वामी लोकसभेच्या रिंगणात उतरणार नाहीत असे वाटत होते. मात्र अचानक मोहोळ दौऱ्यावर खासदार महास्वामी यांनी आपण पुन्हा एकदा सोलापूर लोकसभेसाठी इच्छुक आहोत, पक्षाने जर संधी दिली तर आपण निश्चित पुन्हा लोकसभा लढू असे सांगितल्यामुळे पुन्हा एकदा उमेदवारीसाठी भाजपमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे.

### आ. प्रणिती शिंदेंचे असणार आव्हान

भाजपला जरी सोलापूर लोकसभा मतदासंघ कागदावर सोपा वाटत असला तरी विजयाची हॅट्ट्रिक करण्यासाठी मेहनत करावी लागणार आहे. सलग दोन टर्म भाजपचा खासदार असल्याने आणि म्हणावी तशी विकासकामे झाली नसल्याने मतदारात नाराजी आहे. दुसरीकडे भाजपच्या उमेदवारापुढे आ. प्रणिती शिंदे यांचे आव्हान असणार आहे. आ. शिंदे यांनी शहर मध्य मतदारसंघात मोठी कामे केली आहेत. महिला उमेदवार असल्याने त्यांना सहानुभूती मिळेल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. यावर भाजप कोणती रणनिती आखणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अजित उंब्रजकर**









२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप आपल्या आमदारांना लोकसभा निवडणुकीत उतरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर माळशिरसचे आमदार राम सातपुते हे सोलापूर राखीव लोकसभा मतदारसंघातून उभारणार असल्याची चर्चा जोरदार सुरू आहे. वास्तविक वर्ष दीड वर्षापासून राम सातपुते यांच्या नावाची चर्चा सुरू होती. मात्र गेल्या पंधरा दिवसांपासूनही चर्चा अधिकच सुरू झाली आहे. याबाबत राम सातपुते यांनी थेट भूमिका जाहीर केली नसली तरी पक्ष जी जबाबदारी दिली ती आपण पार पाडू असे म्हटले आहे.

दुसरीकडे सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे समन्वयक म्हणून खासदार अमर साबळे यांचे नियुक्ती करण्यात आली आहे. वास्तविक पाहता २०१४ मध्येच अमर साबळे हे सोलापूर लोकसभेसाठी इच्छुक होते मात्र त्यावेळी भाजपने जातीचे राजकारण करत डॉक्टर जयसिद्धेश्वर महास्वामी यांना निवडणूक रिंगणात उतरवले. आता पुन्हा एकदा अमर साबळे सोलापूर लोकसभा मतदारसंघात सक्रिय झाले आहेत ते जरी सोलापूर लोकसभेत मतदारसंघातून इच्छुक नाहीत असे सांगत असले तरी त्यांची खासदार होण्याची इच्छा लपून राहिलेली नाही सध्या त्यांचे सोलापूर दौरे वाढले आहेत. अमर साबळे हे संघाच्या कुशीत वाढलेले आहेत त्यामुळे ते उमेदवारीसाठी निश्चितच संघाकडून प्रयत्न करणाऱ्या यात कोणतीही शंका नाही.या तिघांशिवाय माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, कोमल ढोबळे यांच्यासह दिलीप कांबळे यांचे नावही सोलापूर लोकसभेसाठी चर्चिले जात आहे.. त्यामुळे आता भाजप कोणाला लोकसभा संधी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विकासकामे हेच आमदार राऊत यांचे बलस्थान

**बार्शी विधानसभा मतदार संघामध्ये सत्ता समीकरणांमध्येही भविष्यात राज्यातील नव्या महायुती सरकारमुळे मोठे बदल होणार आहेत. बार्शीत आगामी काळात होणाऱ्या प्रस्तावित निवडणुकांमध्ये बार्शीची मोठी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या सहा जागा तसेच बाजार समितीची निवडणूक यांचा समावेश आहे. या निवडणुकांमध्ये आमदार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकाऱ्यांनी केलेला कारभार हाच विरोधकांच्या टिकेचा मुख्य मुद्दा असणार आहे तर दुसरीकडे चार वर्षात केलेली विकासकामे हे आ. राऊत यांचे बलस्थान असणार आहे.**

सध्या मुख्यमंत्री शिंदे प्रणित शिवसेनेचे बार्शीत प्रतिनिधीत्व भाऊसाहेब आंधळकर करत आहेत. बार्शीचे विद्यमान आमदार राजाभाऊ राऊत हे अपक्ष म्हणून निवडून आले असले तरी त्यांनी २०१९ साली भाजपाशी एकनिष्ठ राहणार असल्याचे जाहिर केले होते व आता सध्याही ते सर्व आगामी निवडणूका भाजपाच्याच माध्यमातून लढविणार असल्याचे सांगत आहेत. शिवसेनेत फाटाफुट झाली तरी आपण कोणत्या गटात आहोत हे माजी मंत्री दिलीप सोपल यांनी स्पष्ट केले नाहीत. त्यामुळे ते सध्या तरी शिवसेनेच्या ठाकरे गटातच आहेत असे मानायला हरकत नाही. भाजपामध्ये राजेंद्र मिरगणे यांचाही गट आहे. मात्र ते सध्या राजकारणापासून अलिप्त आहेत. तसेच बार्शीचे माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले हे राऊत गटाबरोबर काडीमोड घेवुन राष्ट्रवादींमध्ये दाखल झाले. बारबोले गटाने राष्ट्रवादींमध्ये दोन गट झाल्यानंतर आपण शरद पवार यांच्याच बाजूने राहणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. सध्या तरी बार्शीच्या या राजकीय समीकरणांवरच आगामी निवडणुका होणार असल्याची चिन्हे आहेत.

बार्शीमध्ये आगामी होणाऱ्या सर्व निवडणुका भाजप आमदार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली लढणार आहे. राऊत आणि पदाधिकाऱ्यांनी केलेला कारभार हाच विरोधकांच्या टिकेचा मुख्य मुद्दा आहे. मात्र या निवडणुकांमध्ये आमदार राऊत यांनी विविध क्षेत्रांमध्ये केलेली कोट्यावधी रूपयांची विकास कामे हेच त्यांचे मोठे बलस्थान असणार आहे. गतवर्षी डिसेंबर महिन्यात बार्शीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये मध्यवर्ती रस्त्यावर हजारोंची गर्दी जमावत मोठी सभा घेत आमदार राऊत यांनी विकास कामांचा मोठा धडाका उडवुन दिला.त्यांनतर त्यांनी सातत्याने अनेक विकास कामांसाठी कोट्यावधी रूपयांचा मोठा निधी आणला. त्यामुळे भावी निवडणूकांना तोंड देताना आपण केलेली सार्वजनिक विकास कामे हेच आमदार राऊत यांचे मोठे बलस्थान ठरणार हे उघड आहे.

**सचिन अपसिंगकर**



# शहर- जिल्हा पदाधिकाऱ्यांचा वाद काँग्रेससाठी धोकादायक

**लोकसभेसाठी पाच ते सहा महिन्यांचा कालावधी राहिला असतानाच सोलापूर शहर आणि जिल्हा काँग्रेसमध्ये वादाची ठिणगी पडली. हा वाद काँग्रेससाठी आगामी काळात धोकादायक होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सर्व काही सुरळीत सुरू असताना हे सर्व कशासाठी असा सवाल काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते विचारत आहेत.**



लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ग्रामीण भागात काँग्रेसचे दोन जिल्हाध्यक्ष नेमावे अशी मागणी शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांनी केली होती.यावरून ग्रामीण भागातील डॉ धवलसिंह मोहिते पाटील यांच्या समर्थकांनी व तालुकाध्यक्षकांनी तीव्र विरोध केला होता. पत्रकार परिषद घेऊन ग्रामीण भागातील तालुकाध्यक्षकांनी शहर अध्यक्षकांवर नाराजी व्यक्त केली होती. हे प्रकरण जरी माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना मिटवले असले तरी शिंदे आणि मोहिते-पाटील यांच्या कार्यकर्त्यांमध्ये याची धग राहणार आहे. याचा फटका काँग्रेसला बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

आ. प्रणिती शिंदे यांना लोकसभेची उमेदवारी मिळण्याचे संकेत खुद्द सुशीलकुमार शिंदे यांनीच दिले आहेत. सोलापूर लोकसभेत भाजपची ताकद जास्त आहे. याशिवाय गेल्या दोन लोकसभा निवडणुकित भाजपाने जवळपास दीड लाखांच्या फरकाने काँग्रेस उमेदवाराचा पराभव केला आहे. सध्या सहा पैकी चार विधानसभा मतदारसंघात ठिकाणी भाजपचे आमदार आहेत. मोहोळमधील राष्ट्रवादीच्या आमदारानेही अजितदादा गटाला पर्यायाने भाजपलाच पाठिंबा दिला आहे. अशा परिस्थितीत ग्रामीणमध्ये काँग्रेस कमकुवत आहे. मोदी लाट असतानाही मोहोळमधील ग्रामीण भागातून राजन पाटील यांनी काँग्रेसला मताधिक्य दिले होते. आता त्यांनीही अजितदादा गटाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे ते लोकसभा निवडणुकित दादा सांगतील त्याचा म्हणजेच भाजप उमदेवाराचा प्रचार करणार हे नक्की. चारही बाजूने ग्रामीणमध्ये काँग्रेस बॅकफूटवर गेली असताना अचानक दोन जिल्हाध्यक्षपदाचा वाद उकरून पुन्हा एकदा काँग्रेस अडचणीत आली आहे. जरी पंढरपूर-मंगळवेढा, मोहोळ या ग्रामीण भागात डॉ.धवलसिंहांची ताकद कमी असली तरी काहीप्रमाणात तरी काँग्रेसला फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# वळसंगच्या सरपंचपदासाठी भाऊगर्दी

## इच्छुक उमेदवार लागले कामाला

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत असलेल्या वळसंग ग्रामपंचायत अर्थात मिनी मंत्रालय विविध कारणाने प्रसिद्ध आहे. सरपंच पदासाठी सर्व साधारण जागा असल्याने निवडणूक लढण्यास अनेक इच्छुक सध्या सोशल मीडियाच्या समाज माध्यमावर गर्दी करीत असल्याच्या दिसून येत आहेत. या गावातून सरपंच पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडेल असा मतदार व्यक्त करीत आहेत.**



वळसंग ग्रामपंचायत सरपंच पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव झाले असून विविध गटाच्या, पक्षाच्या व कार्यकर्त्यांची गर्दी सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून दिसू लागली असून ज्यांच्या मनाला येईल तो भावी सरपंच म्हणून सोशल मीडियावर आपला फोटो व्हायरल करीत असल्याचे चित्र सध्या दिसू लागले आहेत.

वळसंग ग्रामपंचायतीवर सध्या सात महिन्यापासून प्रशासक आहे.या गावातून विविध गटाकडून माजी सरपंच श्रीशैल दुधगी,मलकप्पा कोडले, गणी कुरेशी,जगदीश अंटद, शफीक पटेल तर प्रहार संघटनाचे जिल्हा युवक अध्यक्ष मोहसीन तांबोळी यांनी सुद्धा सरपंच पदासाठी इच्छुक असून, स्वतंत्र पॅनल तयार करण्याच्या तयारीत आहेत.बीआरएसकडून अनिल बर्वे यांनी सुद्धा स्वतंत्र पॅनल तयार करणार आहेत. तर हॉटेल व्यवसायिक, उद्योजक सिद्धेश्वर मोरे अपक्ष सरपंच पदासाठी इच्छुक आहेत.सिध्देश्वर मोरे यांनी सुद्धा स्वतंत्र पॅनल तयार करणार आहेत. इच्छुक उमेदवाराच्या नावाची सरपंच पदासाठी जोरदार चर्चा असून काहींनी पॅनल कडून उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष सरपंच उमेदवार म्हणूनही लढण्याची तयारी सुरू केली आहे.

मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या वळसंग ग्रामपंचायत ची निवडणूक सुरू होणार आहे. प्रत्येक जण आपापल्या मर्जीतील लोकांना ग्रामपंचायत सदस्य पदी संधी देण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे. यात मात्र निष्ठावंत संधी पासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सगळ्या निवडणुकिच्या घडामोडीत सर्व पक्षाचे नेते हे 'सैराट' झाले असून कार्यकर्ते मात्र झिंगाट झाल्याचे दिसत आहे. ही निवडणूक आता अनेक नेत्यांच्या अस्तित्वाची व प्रतिष्ठेची बनली आहे. या निवडणुकित जो उमेदवार आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे त्यालाच विविध गटाकडून व पक्षांकडून रिस्पॉन्स मिळणार आहे.


श्रीशैल दुधगी


अनिल बर्वे


गनी कुरेशी


सिध्देश्वर मोरे


मोहसीन तांबोळी

**रविकांत धनशेट्टी**

# सुप्रिया सुळेंच्या मेळाव्यामुळे राष्ट्रवादीला ऊर्जा

## अनेकजण लागले निवडणुकीच्या कामाला

**खासदार सुप्रिया सुळे यांनी नुकतेच माढा तालुक्यात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण झाली असून, जोमाने कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे. परंतु, उत्साह कुठपर्यंत टिकेल हेही पहावे लागणार आहे.**

राज्यामध्ये एक वर्षांपासून अनेक राजकीय नाट्यमय घटना घडल्या. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार भाजपसोबत जाऊन सत्तेत सहभागी झाले. त्यांच्यासमवेत आमदारही गेले. यामध्ये माढा तालुक्याचे आमदार व करमाळ्याचे आमदार अजित पवार यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले गेले. त्यामुळे माढा तालुक्यामध्ये शरद पवार यांना मानणारा गट एकटा पडला आणि शांत झाल्याचे चित्र दिसत आहे. मात्र माढ्याचे आ. बबन शिंदे व करमाळ्याचे आमदार संजयशिंदे यांचा माढा व करमाळामध्ये मोठे वर्चस्व आहे.

ज्या ठिकाणी दादा मामा जातील त्या ठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी जातात. दरम्यान शरद पवार यांना मानणारा गट आणि आमदार शिंदे बंधूंचे विरोधक यांनी पवार यांच्या मागे जाणे पसंत केल्याचे चित्र दिसत होते. मात्र त्यांच्या हालचाली मंदावल्या होत्या.



कुर्डुवाडी शहरामध्ये सुप्रिया सुळे यांची बैठक आयोजित केली. मात्र शिंदे बंधूंचे वर्चस्व पाहता या मेळाव्याला पदाधिकारी व कार्यकर्ते किती संख्येने उपस्थित राहणार याबाबत चर्चा होती. दरम्यान, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते संजय पाटील-घाटणेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तर राष्ट्रवादी काँग्रेसचे कुर्डुवाडी शहराध्यक्ष दत्ता गवळी हे शरद पवार यांच्या पाठीशी ठाम राहिले. याच दरम्यान अनेक पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या. मात्र यांना ऊर्जा मिळावी, यासाठी रविवार, दि.८ रोजी खासदार सुप्रिया सुळे यांचा सोलापूर जिल्हा दौरा झाला. कुर्डुवाडीतील मेळावा आयोजित केला होता. यामध्ये मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती दिसून आली. यामध्ये महिलांचाही सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून आला.

### मेळाव्यात हेरगिरी

कुर्डुवाडीतील खासदार सुप्रिया सुळे यांच्या मेळाव्यामध्ये पदाधिकारी व कार्यकर्ते कोण कोण उपस्थित आहेत. यासाठी हेरगिरी सुरू असल्याची चर्चा झाली. वरिष्ठ नेत्यांसाठी लाईव्ह भाषण एकले जात असल्याचेही बोलले जात होते. हे हेर कोणाचे होते हे सर्वांनाच माहित होते.

### संजय पाटील-घाटणेकर शेवटपर्यंत राहणार का?

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते संजय पाटील-घाटणेकर यांनी ऊस दरासाठी मोठी आंदोलने केली. यानंतर करमाळा विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी घेत मैदानात उतरले होते. मात्र त्यांनी अपक्ष उमेदवार संजय शिंदे यांना पाठिंबा दिल्याची चर्चा झाली. यात संजय शिंदे विजयी झाले. त्यामुळे घाटणेकर पाटील शेवटपर्यंत कायम राहतील का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.



### पाटलांना उमेदवारी?

पंढरपूरचे अभिजीत पाटील यांना लोकसभेची उमेदवारी मिळणार का? त्यांना माढा विधानसभेची उमेदवारी मिळणार, याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे. त्यामुळे राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे.

# मतदार जाब विचारणार !

**सांगोला तालुक्यातील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या चार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व तीन ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने राजकारणात आपले वर्चस्व राखण्यासाठी आपल्या गावात सत्ता अबाधित राखण्यासाठी प्रत्येक पक्षाचे नेते विशेष लक्ष ठेवून आहेत. लोकसभा व विधानसभेच्या तोंडावरील या निवडणुका खऱ्या अर्थाने नेत्यांची परीक्षाच घेतील तर गावात कुणाचा दबदबा कायम आहे, कोणाचे वर्चस्व राहील हे देखील निवडणुकीनंतर स्पष्ट होईल.**



**निसार तांबोळी**

तालुक्यातील मुदत संपलेल्या चिकमहुद खवासपूर, सावे, , वाढेगाव या चार ग्रामपंचायतींची सार्वत्रिक, तर चिणके, ह. मंगेवाडी, मेडशिंगी या तीन ग्रामपंचायतींची पोट निवडणूक होणार आहे. संबंधित ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी मंगळवार पासूनच आचारसंहिता लागू झाली आहे. ग्रामपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांच्या तयारीला वेग आला आहे. निवडणूक आयोगाने अचानक हा कार्यक्रम जाहीर केल्याने निवडणुकीस इच्छुक उमेदवारांची धावपळही सुरु झाली आहे. यामुळे आगामी लोकसभा विधानसभा तसेच नगर परिषद पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीच्या आधीच तालुक्यात राजकीय धुराळा उडणार आहे.

दिवाळीपूर्वीच तालुक्यात राजकीय फटाक्यांची आतषबाजी सुध्दा पहायला मिळणार आहे. शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्या चिकमहुद ग्रामपंचायतीच्या निवडणुकीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. गेल्या निवडणुकीत ग्रामपंचायत बिनविरोध करण्यात शहाजीबापूंना यश आले होते. वाढेगाव ग्रामपंचायतीवर दीपक आबा साळुंखे पाटील यांचे तर सावे ग्रामपंचायतीवर शेकापचे माजी उपसभापती संतोष देवकते यांच्या गटाचे वर्चस्व राहिले होते. खवासपूर, सावे, चिकमहुद, वाढेगाव या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, 'भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

निवडणुका जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवार कामाला लागले आहेत तर सर्वच पक्षाचे नेतेमंडळी ही ग्रामपंचायत आपल्याकडे यावी म्हणून प्रयत्न करणार आहेत पण मतदार राजा तालुक्यात असलेला दुष्काळ स्थानिक प्रश्न वाढलेली बेरोजगारी शेती पाण्याचा आजवरचा प्रश्न वाढलेली महागाई यामुळे या निवडणुकीत मतदार राजा सर्वांनाच जाब विचारणार असल्याने ही निवडणूक चुरशीची खर्चिक व प्रतिष्ठेची होणार आहे